<u>**वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५**</u>

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: गौखनि-१०/०१२५/प्र.क्र.०५/ख-१,**
**हुतात्मा राजगुरु चौक,**
**मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई-३२,**
**दिनांक : ०८ एप्रिल,२०२५**

<u>**वाचा :-**</u>

१) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३.
२) शासन परिपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक : संकीर्ण -२०१९/प्र.क्र.३९/यंबासा दिनांक:१३.११.२०१९.
३) शासन परिपत्रक जलसंपदा विभाग क्रमांक: पीएलन-२०२०/प्र.क्र.३२/जसं(धोरण) दिनांक:११.०८.२०२०
४) महसूल व वन विभाग शासन पत्र क्र.गौखनि-१०/०७२३/प्र.क्र.३४/ख-१, दिनांक २८.०७.२०२३
५) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक : गौखनि-१०/११२३/प्र.क्र.७५/ख-१, दिनांक:१६फेब्रुवारी,२०२४.
६) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक गौखनि-१०/०३२४/प्र.क्र.३४/ख-१, दिनांक:१५मार्च, २०२४
७) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: गौखनि-१०/०१२५/प्र.क्र.१०/ख-१, दिनांक:२४.०१.२०२५
८) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांकः गौखनि-१०/०१२५/प्र.क्र.०५/ख-१, दि.३०.०१.२०२५
९) मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक ०८.०४.२०२५ रोजी झालेल्या बैठकीमधील निर्णय

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील प्रकरण पाच मध्ये, नाला, नदी व खाडीपात्रातील वाळू/रेतीच्या निर्गतीबाबत तरतुदी केल्या असून, नियम ७० मध्ये "लिलाव, विनियोग इत्यादींच्या अटी व शर्ती यासंबंधातील कार्यपध्दती शासनाकडून वेळोवेळी सूचनांच्याद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल," अशी तरतूद केली आहे.

स्थानिक वापर व घरकुलासाठी सहज व सुलभतेने वाळू उपलब्ध करणे, तसेच पारंपारिक व्यवसाय करणा-या स्थानिक व्यक्तींना हातपाटी-डुबी पद्धतीने विनालिलाव पद्धतीचा वापर करुन वाळूगट उपलब्ध करुन देणे, खाजगी शेतजमिनीमध्ये नैसर्गिक कारणामुळे अथवा इतर कारणामुळे जमा झालेली वाळू निष्कासन करुन शेतजमीन लागवडीयोग्य करण्यासाठी वाळूचे निष्कासन करणे तसेच, नैसर्गिक वाळूचे पर्यावरणीय महत्त्व, नैसर्गिक वाळूचा तुडवडा या बाबी विचारात घेऊन कोणत्याही कॉक्रीटच्या बांधकामामध्ये कृत्रिम वाळूच्या वापरास प्रोत्साहन देऊन जास्तीत जास्त कृत्रिम वाळूचा वापर करणे, तसेच पर्यावरण अनुमतीप्राप्त वाळूगटामधून खाडी व नदीपात्रातील वाळूगटांसाठी लिलाव प्रक्रियेचा अवलंब करुन वाळू उत्खनन करणे व मोठ्या खाणींमधील ओव्हरबर्डनमधून निघणाऱ्या वाळूचा वापर करणे यासाठी सद्याच्या वाळू धोरणामध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे.

वाळू उत्खननासाठी परवाना देण्यामागे वाणिज्यिक किंवा महसूल मिळविणे हा एकमेव उद्देश नसून, विकास कामांसाठी तसेच, नागरिकांना वैयक्तिक वापरासाठी सुलभतेने वाळू उपलब्ध व्हावी हा

प्रमुख उद्देश आहे. तसेच नदीपात्रात वाळू साठल्याने आजूबाजूच्या परिसरात पूरसदृश्य परिस्थिती उद्भवू नये म्हणून वाळूचे उत्खनन करण्याचे नियोजन आहे.

वाळू डेपोमधून वाळू उपलब्ध करुन देण्यास क्षेत्रियस्तरावर आलेल्या अडचणी, डेपोपद्धती व लिलावपद्धती यामधील गुण-दोष, विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेऊन दिनांक ३०.०१.२०२५ च्या शासन निर्णयान्वये वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ च्या अनुषंगाने हरकती/सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन वाळू/रेती धोरण दिनांक ०८.०४.२०२५ रोजी झालेल्या मा. मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णयार्थ ठेवण्यात आले होते. मा. मंत्रिमंडळाने याबाबत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेतील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, शासनामार्फत वाळू / रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्री याबाबतचा दिनांक १६.०२.२०२४ चा शासन निर्णय, शेतामधील वाळू निर्गतीबाबतचा दिनांक १५.०३.२०२४ रोजी निर्गमित केलेला शासन निर्णय व परराज्यातून आणलेल्या वाळूचे सनियंत्रण करण्याबाबत दिनांक २४.०१.२०२५ रोजी निर्गमित केलेला शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येऊन त्यामध्ये काही सुधारणा करुन खाली नमूद भाग एक ते भाग चौदा मध्ये नमूद केल्याप्रमाणे वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ याद्वारे निश्चित करण्यात येत आहे.

## भाग - एक

## विविध स्त्रोतांमधून उपलब्ध होणा-या वाळूगटांचे सर्वेक्षण व निश्चिती

महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्रातील नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेतीचे निष्कासन, नदीपात्रामधील वाळूचे निष्कासन, स्थानिक वापरासाठी व घरकुलांसाठी वाळू निर्गती करणे, खाजगी क्षेत्रामध्ये नैसर्गिक अथवा इतर कारणांमुळे साचलेल्या वाळूचे निष्कासन व मोठ्या खाणीमधील ओव्हरबर्डनमधून उपलब्ध करुन उपलब्ध होणारी वाळू विकास कामांसाठी तसेच, नागरिकांना वैयक्तिक वापरासाठी उपलब्ध करण्यासाठी जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समिती वाळूगट निश्चित करेल.

### एक - महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्रातील (खाडी पात्र) नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेतीगटांचे सर्वेक्षण व निश्चिती:-

(i) सीआरझेड तरतुदीनुसार, सीआरझेड क्षेत्रात "वाळू उत्खनन (*Sand Mining)"* प्रतिबंधित आहे. तथापि, सीआरझेड क्षेत्रात जलमार्ग साफ / सुकर करणे ही बाब अनुज्ञेय असून त्यासाठी एमसीझेडएमए (*MCZMA)* ची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

(ii) महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्रातील नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वेळोवळी वाळू/रेतीचे उत्खनन करणे आवश्यक असल्याने, अशा ठिकाणातील वाळू उत्खननाबाबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने दरवर्षी "मे" महिन्यापर्यंत उपलब्ध असलेल्या सर्वेक्षण डेटाच्या आधारे वाळू/रेतीगट निश्चित करावेत,

(iii) सागरी किनारपट्टी क्षेत्रात (*Coastal Regulation Zone)* यांत्रिकी/ड्रेजर पध्दतीने वाळू/रेती उत्खननासाठी महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाची (*Maharashtra Coastal Zone Management Authority)* पूर्वमान्यता मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी घेणे आवश्यक राहील"

(iv) नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी ज्या गटात वाळू/रेती उत्खननासाठी ड्रेझरसारख्या यांत्रिक साधनांचा वापर करणे आवश्यक असल्यास त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्या वतीने संबंधित जिल्हाधिकारी जिल्हास्तरीय वाळू नियंत्रण समितीच्या शिफारशीनुसार "यांत्रिक साधनाव्दारे वाळू/रेती उत्खननासाठी राखीव गट" असे चिन्हांकित करतील.

(v) सागरी विनियमन क्षेत्रामध्ये येणा-या खाडीक्षेत्रात वाळूचे उत्खनन व वाहतूक करण्यासाठी केंद्र शासनाच्या पत्तन, पोत परिवहन आणि जलमार्ग मंत्रालय यांनी निर्गमित केलेल्या *Dredging Guidelines for Major Ports,* २०२१ यांमध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच, *Geophysical* व *Geotechanical Investigation* नुसार उत्खननाची प्रक्रिया राबविण्यात यावी.

(vi) महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे अनुज्ञेय शुल्क भरणे लिलावधारकास बंधनकारक राहील.

(vii) केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार *Accredited Environment Consultant* ची नेमणूक करण्यात येईल. "पर्यावरण अनुमतीसाठी आवश्यक असलेल्या निधीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी संबंधित जिल्हाधिकारी यांना जिल्हा खनिज प्रतिष्ठानअंतर्गत सादर करावा".

(viii) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड हे सागरी किनारपट्टी क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू उत्खनन करावयाच्या क्षेत्रात वाळू / रेती गट, त्यांचे भौगोलिक स्थान, वाळू / रेतीचा अंदाजित साठा, नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी करावयाच्या उत्खननाचे परिमाण व उपलब्ध पोचमार्ग, इत्यादी निश्चित केल्यानंतर महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्या वतीने निश्चित करण्यात आलेल्या वाळू / रेतीगटातून वाळू/रेती उत्खननाची व्यवस्था करण्यास व सदर व्यवस्थेवर सनियंत्रण ठेवण्यास संबंधित जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करतील.

(ix) खाडीपात्रातून उत्खननासाठी निश्चित केलेल्या वाळू/रेती गटातून उत्खननासाठी प्रस्तुत धोरणाच्या **भाग- चार** मध्ये विहित केलेल्या लिलावाच्या कार्यपपद्धतीप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**दोन -नदीपात्रामधील वाळूगटांचे सर्वेक्षण :-**

तालुकास्तरीय तांत्रिक समिती व तालुकास्तरीय वाळू सनियंत्रण समितीने सादर केलेल्या अहवालानुसार नदीपात्रातील वाळूगट निश्चित करण्याची कार्यवाही जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समिती करील.

नदीपात्रातून उत्खननासाठी निश्चित केलेल्या वाळू/रेतीगटातून उत्खननासाठी प्रस्तुत धोरणाच्या **भाग- चार** मध्ये विहित केलेल्या लिलावाच्या कार्यपद्धतीप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**तीन- स्थानिक वापरासाठी व घरकुलांसाठी वाळू निर्गती करणे:-**

ग्रामपंचायत हद्दीमधील वाळूस्थळातून वाळू उत्खननाकरिता केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालय (भारत सरकार) यांचेकडील दि.२८ मार्च, २०२० च्या अधिसूचनेतील APPENDIX-IX मधील अनुक्रमांक ४ ची तरतूदीनुसार

निश्चित केलेले वाळू गट, ज्या वाळू घाटास पर्यावरण अनुमती प्राप्त झाली आहे व जे वाळू घाट लिलावामध्ये गेलेले नाही असे नदी, नाले, ओढे इत्यादी मधील वाळूगट स्थानिक वापरासाठी व घरकुलांसाठी उपलब्ध करणे.

याबाबतची सविस्तर कार्यपद्धती प्रस्तुत धोरणाच्या **भाग पाच** मध्ये विहित केली आहे.

## चार - खाजगी शेतजमिनीमध्ये जमा झालेल्या वाळूचे निष्कासन करणे:-

शेतक-यांना शेतजमीन लागवडीयोग्य करण्यासाठी शेतजमिनीमध्ये नैसर्गिक कारणामुळे अथवा इतर कारणामुळे जमा झालेल्या वाळू/रेतीचे निष्कासन करणे आवश्यक असल्यास प्रस्तावित ठिकाणी किती प्रमाणात वाळू निष्कासन करणे उचित राहील याबाबत तसेच, सदर उत्खननामुळे जलस्रोतावर होणाऱ्या संभाव्य परिमाणाबाबत उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती त्याबाबतचा संयुक्त अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करेल. जिल्हाधिकारी यांनी सदर अहवालाची तपासणी करुन त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणे बंधनकारक राहील.

याबाबतची सविस्तर कार्यपद्धती प्रस्तुत धोरणाच्या **भाग सहा** मध्ये विहित केली आहे.

## पाच - हातपाटी-डुबी पद्धतीने वाळू निर्गतीकरीता वाळूगट निश्चित करणे

(i) "विनालिलाव परवाना पध्दतीने डुबी / हातपाटीव्दारे वाळू/रेती उत्खननासाठी राखीव गट" यामधून पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या स्थानिक व्यक्तींना तसेच अशा व्यक्तींच्या संस्थांना वाळू/रेती उत्खननाचे परवाने देण्यासाठी पर्यावरण अनुमती घेणे आवश्यक नाही. याबाबत संबंधित जिल्हाधिकारी केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाचे कार्यालयीन आदेश दिनांक ०८.११.२०११ नुसार कार्यवाही करतील.

(ii) महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्रातील स्थानिक व्यक्तींना त्यांचा पारंपारिक व्यवसाय करणे शक्य व्हावे म्हणून सागरी किनारपट्टी / खाडी येथील Intertidal क्षेत्रातील डुबी / हातपाटी पध्दतीने वाळू रेतीचे उत्खनन करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ यांचे वतीने जलालेखांक (Hydrographer) यांनी खाडीपात्रातील हातपाटी / डुबी पध्दतीने उत्खनन करण्यासाठी उपयुक्त रेतीसाठा असणाऱ्या Intertidal क्षेत्राचे सर्वेक्षण करुन व त्याप्रमाणे गटांची निश्चिती करावी व त्याबाबत परिपूर्ण प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करावा. सदर प्राप्त प्रस्तावानुसार जिल्हास्तरीय वाळू संनियंत्रण समिती ही, उपलब्ध गटांमधून स्थानिकांकडून उत्खननाची मागणी लक्षात घेऊन योग्य त्या गटांना विनानिविदा परवाना पध्दतीने डुबी /हातपाटीद्वारे वाळू / रेती उत्खननासाठी राखीव गट" असे चिन्हांकित करुन अंतिम निर्णय घेतील.

(iii) हातपाटी-डुबी पद्धतीने वाळू निर्गतीकरीता प्रस्तुत धोरणाच्या **भाग- सात** मध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

## सहा- कृत्रिम वाळू :-

नैसर्गिक वाळूचे पर्यावरणीय महत्त्व, नैसर्गिक वाळूचा तुटवडा या बाबी विचारात घेऊन शासकीय बांधकामांसह इतर कोणत्याही कॉक्रीटच्या बांधकामासाठी कृत्रिम वाळूचा वापर बंधनकारक करण्यात यावा. अशा बांधकामामध्ये वापरावयाच्या कृत्रिम वाळूच्या प्रमाणाबाबत सदर धोरणाच्या **भाग-आठ** मध्ये माहिती दिलेली आहे.

**सात - केंद्र/ राज्य शासनाच्या मोठ्या खाणीमधील ओव्हरबर्डनमधील वाळू व इतर गौण खनिजांची निर्गती:-**

नैसर्गिक वाळूचे पर्यावरणीय महत्त्व खूप असून नैसर्गिक वाळू जलपरिसंस्थेसाठी महत्वाची आहे. त्यामुळे नदीपात्रातील वाळूवर पडणारा ताण कमी करण्यासाठी केंद्र/ राज्य शासनाच्या कोळसा किंवा इतर मोठ्या खाणकामामधून उप-उत्पादने म्हणून निघणाऱ्या ओव्हरबर्डनमधून तयार करता येणा-या पर्यावरणपूरक वाळू निर्माण करता येते. सदर खदानीमधून निघणारी वाळू/वॉश वाळू शासन निश्चित करेल ते स्वामित्वधन आकारुन विकास कामांसाठी तसेच नागरिकांना वैयक्तिक वापरासाठी उपलब्ध करुन देता येईल. तसे निश्चित केल्यास खदानीमध्ये मोठ्या प्रमाणात उपलब्ध असणारे ओव्हरबर्डन इतरत्र रस्त्यांच्या कामाकरिता, इमारतींच्या पायासाठी, पांधन रस्ते बांधण्यासाठी तसेच इतर कामांसाठी उपयोगी पडून ओव्हरबर्डनची विल्हेवाट लावली जाईल व शासनास त्यातून मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होईल.

याबाबत सविस्तर कार्यपद्धती प्रस्तुत धोरणाच्या **भाग-नऊ** मध्ये विहित केली आहे.

********************

## भाग - दोन

## समित्या

**वाळू/रेतीगटांचे सर्वेक्षण, निश्चिती करण्याची कार्यवाही खालील समित्या करतील सदर समित्यांची रचना व कार्ये खालीलप्रमाणे :-**

**अ) नदीपात्रातील वाळूगटांचे स्थळ निरीक्षण खालील तांत्रिक उपसमितीमार्फत करण्यात येईल.**

| | | |
|---|---|---|
| i | तहसिलदार | अध्यक्ष |
| ii | गट विकास अधिकारी, पंचायत समिती | सदस्य |
| iii | उप अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य |
| iv | कनिष्ठ भूवैज्ञानिक (भूविज्ञान खनिकर्म संचालनालयामार्फत नामनिर्देशित) | सदस्य |
| v | कनिष्ठ भूवैज्ञानिक (भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचेमार्फत नामनिर्देशित) | सदस्य |
| vi | वन विभागाचे प्रतिनिधी | सदस्य |
| vii | नायब तहसिलदार | सदस्य सचिव |

**तांत्रिक उपसमितीचे अधिकार व कार्ये :-**

१) तांत्रिक उपसमितीने अवर्षणग्रस्त व सतत टंचाईग्रस्त भागात वाळू उत्खननामुळे पर्यावरण तसेच पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम होत असल्यास अशा भागात वाळू / रेती गट निश्चित करु नये.

२) सदर तांत्रिक उपसमितीमार्फत वाळूगट निश्चित करताना स्थानिक पर्जन्यमान तसेच भौगोलिक परिस्थिती व इतर पर्यावरणविषयक अनुकूल बाबी, वाळू निर्मिती (Replenishment) चा विचार करुनच वाळूगट उत्खननासाठी योग्य आहेत किंवा कसे, याबाबत तालुकास्तरीय वाळू संनियंत्रण समितीस शिफारस करील.

३) जिल्ह्यातील नद्यांचे सर्वेक्षण MRSAC, नागपूर या संस्थेमार्फत पुढील वर्षापासून करणे बंधनकारक असेल व त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या त्या त्या नद्यांतील वाळूच्या परिमाणाची आकडेवारी विचारात घेऊन वाळूगट निश्चितीची कार्यवाही करण्यात यावी. त्याबाबतचा खर्च निधी जिल्हा खनिज प्रतिष्ठाणमधून भागविण्यात यावा.

**ब) तालुकास्तरीय वाळू संनियंत्रण समिती** -

जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासाठी तालुकास्तरीय वाळू संनियंत्रण समिती (Taluka Sand Monitoring Committee) स्थापन करण्यात येईल. (सदर समितीचा उल्लेख यापुढे "तालुकास्तरीय समिती" म्हणून करण्यात येईल.)

**सदर समितीची रचना खालीलप्रमाणे असेल:-**

| | | |
|---|---|---|
| १. | उप विभागीय अधिकारी | अध्यक्ष |
| २. | उप विभागीय पोलीस अधिकारी | सदस्य |
| ३. | कनिष्ठ भूवैज्ञानिक<br>(भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयामार्फत नामनिर्देशित ) | सदस्य |
| ४. | कनिष्ठ भूवैज्ञानिक<br>(भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचेमार्फत नामनिर्देशित) | सदस्य |
| ५. | गटविकास अधिकारी, पंचायत समिती | सदस्य |
| ६. | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ७. | कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य |
| ८. | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ९. | प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १०. | तहसिलदार | सदस्य सचिव |

एखाद्या विशिष्ट मुद्याबाबत सल्ला व मार्गदर्शनासाठी या समितीचे अध्यक्ष अन्य तज्ञ व्यक्ती तथा अधिकारी यांची निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करू शकतील.

**तालुकास्तरीय वाळू / रेती संनियंत्रण समितीचे अधिकार व कार्ये** :-

(i)तालुकास्तरीय समितीची बैठक दोन महिन्यांत किमान एकदा होईल.

(ii)तालुकास्तरीय समिती वाळू उत्खननासाठी निश्चित केलेल्या वाळूगटातून उत्खननाचे अंदाजित परिमाण ठरवेल. वाळूगट निश्चित करताना सदर गटाचे अक्षांश रेखांशासह प्रमाणित नकाशा सादर करणे आवश्यक राहील.

(iii)तालुकास्तरीय समिती ही जिल्हास्तरीय समितीस Sustainable Sand Mining Guidelines, २०१६, Sand Mining Framework, २०१८, Enforcement & Monitoring Guidelines for Sand Mining,२०२० आणि केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार District Survey Report तयार करण्यास सहकार्य करील.

(iv)तालुकास्तरीय समिती निश्चित केलेल्या वाळूगटाचे निर्गती जाहीर ऑनलाईन ई - लिलाव पध्दतीने करण्यासाठी संयुक्त स्थळ पाहणी अहवाल परिपूर्ण कागदपत्रे व स्पष्ट शिफारशींसह जिल्हास्तरीय समितीस सादर करील.

(v)सदर समिती पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीनुसार वाळूगटातून उत्खनन होत आहे किंवा कसे याबाबत संनियंत्रण व पर्यवेक्षण करील.

(vi)सदर समिती या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या शिफारशी जिल्हास्तरीय वाळू संनियंत्रण समितीस करील.

(vii)कार्यक्षेत्रात उपलब्ध असणारे वाळूसाठे शोधणे तसेच नदीपात्रातील वाळू उत्खननाला पर्याय म्हणून इतर स्त्रोत शोधणे (जसे मातीमिश्रीत वाळू, धरणातील वाळू, इ.) याबाबतही समिती शिफारस करील.

(viii)सदर समिती अधिसूचित क्षेत्रासाठी पेसा कायदा, २०११ मधील तरतूदींनुसार किंवा त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांनुसार रेतीगटांचे निर्धारण करील.

(ix)वरील व्यतिरिक्त तालुकास्तरीय समिती ही जिल्हास्तरीय वाळू संनियंत्रण समितीने वेळोवेळी सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडतील.

**क) जिल्हास्तरीय वाळू संनियंत्रण समिती** -

प्रत्येक जिल्ह्यामध्ये वाळू/रेती निर्गतीसंबंधी संपूर्ण प्रक्रियेचे संनियंत्रण करण्यासाठी जिल्हास्तरीय वाळू संनियंत्रण समिती (District Sand Monitoring Committee) गठीत करण्यात येईल. (यापुढे ज्याचा उल्लेख "जिल्हास्तरीय समिती" म्हणून करण्यात येईल.)

सदर समितीची संरचना पुढीलप्रमाणे असेल:-

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ३) | पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्त | सदस्य |
| ४) | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ५) | कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य |
| ६) | उप वनसंरक्षक, वन विभाग | सदस्य |
| ७) | प्रादेशिक परिवहन अधिकारी | सदस्य |
| ८) | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | सदस्य |
| ९) | वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण यंत्रणा | सदस्य |
| १०) | महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे प्रतिनिधी (खाडी क्षेत्रासाठी) | सदस्य |
| ११) | जिल्हा खनिकर्म अधिकारी | सदस्य सचिव |

एखाद्या विशिष्ट मुद्याबाबत सल्ला व मार्गदर्शनासाठी या समितीचे अध्यक्ष अन्य तज्ञ व्यक्ती तथा अधिकारी यांची निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करू शकतील.

**जिल्हास्तरीय समितीचे अधिकार व कार्ये :-**

(i)समितीची बैठक तीन महिन्यांतून किमान एकदा घेणे आवश्यक राहील.

(ii)योग्य संनियंत्रणाकरीता समितीला जिल्ह्यातील वाळूगटांचे Digitization महाराष्ट्र सुदूर संवेदन यंत्रणा अथवा मान्यताप्राप्त अभिकर्त्यामार्फत आवश्यकतेनुसार करता येईल.

(iii)वाळूगट निश्चिती व उत्खननाबाबत सर्व कार्यपद्धती ही मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी दिलेले निदेश तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार राहील याची दक्षता घेईल.

(iv)जिल्ह्यातील नद्यांचे सर्वेक्षण MRSAC, नागपूर या संस्थेमार्फत पुढील वर्षापासून करणे बंधनकारक असेल व त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या त्या त्या नद्यांतील वाळूच्या परिमाणाची आकडेवारी विचारात घेऊन वाळूगट निश्‍चितीची कार्यवाही करण्यात यावी. त्याबाबतचा खर्च निधी जिल्हा खनिज प्रतिष्ठाण निधीमधून भागविण्यात यावा.

(v)पर्यावरणविषयक अनुमती व त्याबाबतच्या अन्य कामांसाठी व District Survey Report तयार करण्यासाठी मान्यताप्राप्त सल्लागाराची नेमणूक करण्याचे अधिकार सदर समितीस असतील.

(vi)लिलावाकरीता पर्यावरण अनुमतीप्राप्त वाळूगट निश्चित करतील.

(vii)हातपाटी/डुबी यासारख्या पारंपारिक पद्धतीने वाळू काढण्यासाठी स्थानिक व्यक्ती तसेच स्थानिक संस्थांना परवाना देण्याकरीता वाळूगट राखीव ठेवतील.

(viii) नैसर्गिक वाळूचे पर्यावरणीय महत्त्व, नैसर्गिक वाळूचा तुडवडा या बाबी विचारात घेऊन कॉक्रीटच्या बांधकामामध्ये जास्तीत जास्त कृत्रिम वाळूचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्याच्या अनुषंगाने उपाययोजना करील.

(ix)नैसर्गिक वाळूचे पर्यावरणीय महत्त्व, नैसर्गिक वाळूचा तुडवडा या बाबी विचारात घेऊन विविध विभागांच्या शासकीय बांधकामामध्ये सुरुवातीला २० टक्के कृत्रिम वाळूचा वापर बंधनकारक करण्यात येऊन हे प्रमाण टप्प्याटप्प्याने वाढविण्यात यावे.

(x)वाळू लिलावाच्या प्रक्रियेकरिता हातची किंमत शासनाच्या या संदर्भातील निर्देशानुसार प्रतिब्रास या स्वरुपात निश्‍चित करेल.

(xi)सदर समिती वाळू/रेती उत्खनन/विकसन व वाहतुकीबाबत आवश्यकतेनुसार यथायोग्य निर्णय घेईल.

(xii)या निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता सदर समिती जिल्ह्यातील शासकीय / निमशासकीय तथा स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना निर्गमित करतील.

(xiii)या शासन निर्णयाद्वारे निर्धारित केलेल्या तरतुदी, अटी व शर्तीच्या अधिन राहून सदर समिती वाळूगटांतून वाळू उत्खननाची मंजुरी देणे किंवा वाळू उत्खननाचा परवाना प्रदान करणे याबाबत जिल्हाधिकारी यांना शिफारस करील.

(xiv)गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या तक्रारींच्या पडताळणीसाठी दक्षता समितीच्या जबाबदाऱ्या विवक्षितपणे पार पाडतील.

********************

## भाग- तीन

## खाणकाम आराखडा, पर्यावरण अनुमती व ग्रामसभेची शिफारस

### एक - वाळू/रेती उत्खननासाठी खाणकाम आराखडा :-

Sustainable Sand Mining Guidelines, २०१६ व २०२०, तसेच Sand Mining Framework, २०१८ आणि केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार वाळूगटांच्या लिलावापूर्वी जिल्हाधिकारी यांच्याकडून खाडीपात्रासाठी ३ वर्ष कालावधीचा व नदीपात्रासाठी २ वर्ष कालावधीचा खाणकाम आराखडा तयार करण्यात येईल.

## दोन-पर्यावरण अनुमती :-

अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्यासमवेत प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांची दिनांक १३.१०.२०२३ रोजी बैठक झाली होती. सदर बैठकीमध्ये ज्या वाळूगटातून वाळू उत्खनन करावयाचे आहे त्यासाठी ३ वर्षापर्यंतचा खाणकाम आराखडा (Mining Plan) जिल्हाधिकारी यांनी तयार केल्यास तेवढ्या कालावधीसाठी पर्यावरण विभागामार्फत पर्यावरण अनुमती देण्याचे तत्कालिन सचिव, पर्यावरण विभाग यांनी मान्य केले आहे. त्या अनुषंगाने शासनाने दिनांक १८.१०.२०२३ च्या पत्रान्वये सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांना ३ वर्षांचा खाणकाम आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. पर्यावरण अनुमतीचे प्रस्ताव पर्यावरण विभागास सादर करताना तीनही वर्षाकरिता नदी पुनर्भरण अहवालासह (Replenishment Study Report) प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे जेणे करुन पर्यावरणाचा समतोल राखणे शक्य होईल.

### अ) खाडीपात्रातील वाळूगटांसाठी पर्यावरण अनुमती:-

मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्रमांक (सी) क्र.१९६२८-१९६२९/२००९ मध्ये दि.२७/०२/२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार व मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पश्चिम विभाग, खंडपीठ पुणे यांनी अर्ज क्र.३४ (टीएचसी)/२०१३ (डब्लूझेड) मध्ये दिनांक २९.०५.२०१४ रोजी दिलेल्या आदेशानुसार वाळू/रेती उत्खननापूर्वी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल विभागाच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेतील (EIA Notification -२००६) तरतुदीनुसार, पर्यावरण अनुमती घेण्याची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी करणे आवश्यक राहील. पर्यावरण विभागाच्या सहमतीने ३ वर्षापर्यंत पर्यावरण अनुमती घेण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच उत्खननाचा २ वर्षांचा कालावधी संपल्यानंतर पुढील कालावधीसाठी पर्यावरण अनुमती घेण्याची प्रक्रिया सुरु करावी. पर्यावरण अनुमतीचे प्रस्ताव पर्यावरण विभागास सादर करताना तीनही वर्षाकरिता नदी पुनर्भरण अहवालासह (Replenishment Study Report) प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील जेणे करुन पर्यावरणाचा समतोल राखणे शक्य होईल.

सीआरझेड तरतूदीनुसार, सीआरझेड क्षेत्रात "वाळू उत्खनन (Sand Mining)" प्रतिबंधित आहे. तथापि, सीआरझेड क्षेत्रात जलमार्ग साफ / सुकर करणे ही बाब अनुज्ञेय असून त्यासाठी एमसीझेडएमए (MCZMA) ची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

### ब) नदीपात्रातील वाळू/रेती उत्खननासाठी पर्यावरण अनुमती -

(i)मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी दिलेले निदेश तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार पर्यावरण अनुमती व अनुषंगिक बाबींबद्दल कार्यवाही करणे आवश्यक आहे. पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्याशिवाय वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

(ii)वाळू/रेती गटांतून वाळू उत्खननापूर्वी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या वेळोवेळी प्रसिध्द होणाऱ्या अधिसूचनेनुसार त्या-त्या वेळी कार्यक्षेत्र असलेली तज्ञ मूल्यांकन समिती (Expert Appraisal Committee) व पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (Environment Impact Assessment Authority) या समित्यांची मान्यता घेण्यासाठी जिल्ह्यातील वाळूगटांचे परिपूर्ण प्रस्ताव सर्वेक्षणानुसार विहीत केलेल्या फॉर्ममध्ये प्रकल्प प्रवर्तक म्हणून जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्याकडून अशा समितीसमोर सादर करण्यात यावेत. पर्यावरण विभागाच्या सहमतीने २ वर्षापर्यंत पर्यावरण अनुमती घेण्याची

कार्यवाही जिल्हाधिकारी यांच्याकडून करण्यात यावी. उत्खननाचा १ वर्षाचा कालावधी संपल्यानंतर पुढील कालावधीसाठी पर्यावरण अनुमती घेण्याची प्रक्रिया सुरु करावी.

(iii)वाळूगटाच्या उत्खननाचा कालावधी केंद्र शासनाच्या पर्यावरण वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश विचारात घेऊन निश्चित करावा. तसेच, वाळू गटाचे क्षेत्र सदर गटात उत्खननासाठी उपलब्ध वाळूसाठ्यानुसार निश्चित करण्यात यावे. पर्यावरण विभागाच्या सहमतीने २ वर्षांपर्यंत पर्यावरण अनुमती घेण्याची कार्यवाही करताना दोन्ही वर्षाकरिता नदी नदी पुनर्भरण अहवालासह (Replenishment Study Report) प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील जेणे करुन पर्यावरणाचा समतोल राखणे शक्य होईल.

(iv)पर्यावरण अनुमतीसाठी आवश्यकतेनुसार Accredited Environment Consultant ची नेमणूक करण्यात येईल. यासाठी येणारा खर्च जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीतून पर्यावरणासाठी उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविता येईल.

(v)सदर प्रस्ताव ज्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात येतील, त्या बैठकीस Accredited Environment Consultant यांच्यासह जिल्हा खनिकर्म अधिकारी हे स्वत: उपस्थित राहतील.

(vi)प्रकल्प प्रवर्तक म्हणून प्रकरणपरत्वे यथास्थिती पर्यावरण समितीसमोर पर्यावरण अनुमतीचे प्रस्ताव सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पदनामाने पर्यावरण अनुमती प्राप्त होईल.

(vii)वाळू/रेतीगटांतून वाळू उत्खननापूर्वी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या वेळोवेळी प्रसिध्द होणाऱ्या अधिसूचनेनुसार त्या-त्या वेळी कार्यक्षेत्र असलेल्या तज्ञ मूल्यांकन समिती (Expert Appraisal Committee) व पर्यावरण आघात मूल्यांकन प्राधिकरण (Environment Impact Assessment Authority) या समित्यांची मान्यता घेण्याची प्रक्रिया वाळूगट निश्चितीनंतर करण्यात यावी.

**क) पर्यावरण अनुमतीबाबत सर्वसाधारण सूचना :-**

i. लिलावधारकाला इरादापत्र (LOI) दिल्यानंतर १ आठवड्याच्या आत पर्यावरण अनुमती संबंधित लिलावधारक यांच्या नावे हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी पर्यावरण आघात मूल्यांकन प्राधिकरणाकडे (Environment Impact Assessment Authority) सादर करावा.

ii. लिलावासाठी प्रस्तावित केलेल्या सर्व वाळूगटांसाठी जनसुनावणी (Public Hearing) घेणे बंधनकारक राहील.

## तीन- नदीपात्रातील वाळू/रेती लिलावाकरीता ग्रामसभेची शिफारस -

पंचायत विस्तार (अनुसूचित क्षेत्र) अधिनियम, १९९६ (पेसा) नुसार अनुसूचित क्षेत्रामधील नदी-पात्रातील वाळूगटांकरीता ग्रामसभेची शिफारस घेणे अनिवार्य राहील. तथापि, इतर क्षेत्रातील वाळूगटांकरीता ग्रामसभेची शिफारस अनिवार्य राहणार नाही.

*****************

## भाग -चार

## लिलावाद्वारे निर्गती

(i) पर्यावरण अनुमतीप्राप्त खाडी व नदीपात्रातील वाळूगटांची लिलावाद्वारे निर्गती करण्यात येईल.

(ii) जिल्ह्यातील नदीपात्रासाठी प्रत्येक उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व वाळूगटांची एकत्रितरित्या एकच ई-लिलाव प्रसिद्ध करण्यात यावा. खाडीपात्रातील वाळूगटांसाठी महाराष्ट्र सागरी मंडळाने निश्चित केलेल्या प्रत्येक वाळूगटासाठी ई-लिलाव पद्धतीने कार्यवाही करण्यात यावी.

(iii) लिलावाचा कालावधी खाडीपात्रासाठी ३ वर्षाचा व नदीपात्रासाठी २ वर्षाचा राहील. त्याप्रमाणे पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी/महाराष्ट्र मेरिटाईम मंडळाने करावी.

(iv) **हातची किंमत (Upset price) :-** शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या वाळूच्या स्वामित्वधनाची रक्कम आणि संबंधित वाळूगटातून वाळूचे होऊ शकणारे उत्खनन यांचा गुणाकार केल्यानंतर येणारी रक्कम अशा वाळूगटाची हातची किंमत (Upset price) म्हणून निश्चित करण्यात यावी. यासाठी उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रामधील सर्व लिलावक्षम वाळूगट निश्चित करुन त्याची हातची किंमत निश्चित केली जाईल.

(v) **इसारा रक्कम :-** लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्थेला निविदेसोबत इसारा रक्कम म्हणून लिलावाच्या हातच्या रकमेच्या २५ टक्के रक्कम भरावी लागेल.

(vi) **सुरक्षा ठेव/अनामत रक्कम :-** यशस्वी लिलावधारकाने/परवानाधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीच्या यथोचित पालनार्थ लिलावाच्या बोलीच्या रकमेच्या २५% एवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून भरणे आवश्यक राहील. लिलावाचा कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर १ महिन्याच्या आत अनामत रक्कम लिलावधारकास परत करण्यात येईल. तथापि, लिलावधारकास केलेल्या दंडाची वसुली प्रलंबित असल्यास अशी वसुली अनामत रक्कमेतून करण्यात येईल.

**(अ) वाळूगटाच्या लिलावाकरीता अधिकारिता**: -

(i)जिल्ह्यातील सर्व वाळूगटांचे लिलाव जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली करण्यात यावेत.

(ii)एखादा वाळूगट एका महसूल विभागातील दोन जिल्ह्यांमध्ये संयुक्तरित्या येत असेल तर दोन्ही जिल्हाधिकारी यांनी संयुक्त पाहणी करुन व सल्लामसलत करुन त्याची संयुक्त वाळूगट म्हणून निश्चिती करावी आणि यासंबंधीचा अहवाल विभागीय आयुक्त यांना सादर करावा. तद्‌नंतर विभागीय आयुक्त दोन जिल्हाधिकाऱ्यांपैकी ज्या एका जिल्हाधिकाऱ्यास अशा संयुक्त वाळूगटाच्या लिलावाची कार्यवाही करण्यास निर्देश देतील, त्या जिल्हाधिकाऱ्याने सदर संयुक्त वाळूगटाच्या लिलावाची कार्यवाही पूर्ण करावी. अशा लिलावात प्राप्त रक्कम वाळूगटाच्या परिमाणानुसार दोन्ही जिल्ह्यांमध्ये मानीव विभाजन करुन शासनजमा करण्यात यावी.

(iii)एखादा वाळूगट दोन महसूल विभागांमधील दोन जिल्ह्यांमध्ये संयुक्तरित्या येत असेल तर अशा प्रकरणांतसुध्दा दोन्ही जिल्हाधिकारी यांनी संयुक्त पाहणी करुन व सल्लामसलत करुन, यासंबंधीचा अहवाल संबंधित दोन्ही विभागीय आयुक्त यांना सादर करावा. विभागीय आयुक्त हे सल्लामसलत करुन, दोन जिल्हाधिकाऱ्यांपैकी ज्या एका जिल्हाधिकाऱ्यास लिलावाची कार्यवाही करण्यास निर्देश देतील, त्या जिल्हाधिकाऱ्याने सदर संयुक्त वाळूगटाच्या लिलावाची कार्यवाही पूर्ण करावी. अशा लिलावात प्राप्त रक्कम वाळूगटाच्या परिमाणानुसार दोन्ही जिल्ह्यांमध्ये मानीव विभाजन करुन शासनजमा करण्यात यावी.

अशा संयुक्त वाळूगटाच्या लिलावाविषयी दोन्ही विभागीय आयुक्त यांचे एकमत न झाल्यास त्यासंबंधीचा स्वयंस्पष्ट प्रस्ताव शासनास निर्णयार्थ सादर करण्यात यावा.

**(आ) लिलावधारक यांच्यासाठी आवश्यक पात्रता**

(i)लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्था यांच्याकडे नियमित आयकर भरत असल्याचा पुरावा, पॅन क्रमांक, वस्तू व सेवाकर विभागाचा GSTIN क्रमांक असणे आवश्यक राहील.

(ii)लिलावामध्ये भाग घेणारी व्यक्ती महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणे बंधनकारक राहील.

(iii)लिलावात भाग घेणारी व्यक्ती/संस्था यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील:-

| अ.क्र. | व्यक्ती/संस्थेचे नाव | सादर करावयाचे कागदपत्र |
|---|---|---|
| १ | For Individual | Aadhar Card/PAN Card |
| २ | Partnership Firm | Registration Certificate issued by Approriate Authority |
| ३ | Company | Registration Certificate issued by Approriate Authority |
| ४ | Society | Registration Certificate issued by Approriate Authority |
| ५ | Limited Liability Partnership (LLP), | Registration Certificate issued by Approriate Authority |
| ६ | Consortium | Registration Certificate issued by Approriate Authority |

(iv)लिलावामध्ये भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्थेचे मागील आर्थिक वर्षाचे निव्वळ वार्षिक उत्पन्न लिलावाच्या हातच्या किंमतीच्या १० % असणे आवश्यक राहील.

(v)लिलावामध्ये भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्थेची मागील ३ वर्षांपैकी कोणत्याही एका वर्षाची वार्षिक उलाढाल खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे:-

| अ.क्र. | वाळू साठा | वार्षिक उलाढाल (रुपये) |
|---|---|---|
| १ | ५,००० ब्रासपर्यंत | ५० लाख |
| २ | ५,००१ ते १०,००० ब्रास | १ कोटी |
| ३ | १०,००१ ते १५,००० ब्रास | २ कोटी |
| ४ | १५,००१ ते २०,००० ब्रास | ३ कोटी |

| | | |
|---|---|---|
| ५ | २०,००१ ते २५,००० ब्रास | ४ कोटी |
| ६ | २५,००० ब्रासपेक्षा जास्त | ५ कोटी |

(vi)ई-लिलाव भरु इच्छिणाऱ्या व्यक्ती/संस्था यांना अर्जाचे शुल्क, वाळूगटाची हातची किंमत रू. १०.०० लाखापेक्षा कमी असल्यास रू.२,०००/- व रू.१०.०० लाखापेक्षा जास्त असल्यास रू.५,०००/- संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाने धनादेशाद्वारे किंवा जिल्हाधिकारी सूचित करतील त्या पध्दतीने भरावी लागेल.

(vii)लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्थेला निविदेसोबत इसारा रक्कम म्हणून लिलावाच्या हातच्या किंमतीच्या २५ टक्के रक्कम भरावी लागेल.

(viii)कोणतीही व्यक्ती किंवा कंपनी/ संस्था लिलावात भाग घेण्यास खालील कारणास्तव अपात्र असतील:-

अ) वयाने अज्ञान, दिवाळखोर किंवा मतिमंद व्यक्ती किंवा

आ)केंद्र अथवा राज्य शासनामध्ये लाभाचे पद धारण केलेल्या व्यक्ती किंवा

इ) गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची थकबाकी किंवा मृतभाटकाची रक्कम (Dead Rent) थकविण्यात आली असणारी व्यक्ती / संस्था (या प्रयोजनार्थ जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत गौण खनिजाचे स्वामीत्वधन, मृतभाटक रक्कम, किंवा शासनाच्या महसूलाची थकबाकीदारांची यादी वेळोवेळी तयार करण्यात येईल व प्रसिद्ध करण्यात येईल.)

ई) नैतिक अध:पतन केल्याबद्दल किंवा गौण खनिजाचे अवैध उत्खनन किंवा वाहतूक केल्याबाबत न्यायालयाकडून शिक्षा झाली असेल अशी व्यक्ती / संस्था.

उ) अवैध उत्खनन प्रकरणी जप्त केलेली वाहने ज्यांच्या मालकीची असतील अशी व्यक्ती अथवा संस्था.

**(इ) वाळू/रेती धोरणाच्या अंमलबजावणीचे सर्वसाधारण वेळापत्रक :-**

| अ.क्र. | विषय | दिनांक/कालावधी |
|---|---|---|
| १ | वाळूगटांचे प्रस्ताव | दि. ३१ मार्चपर्यंत तलाठी यांच्यामार्फत तहसिलदार यांना सादर करणे |
| २ | वाळूगटांचे सर्वेक्षण करणे | दि. ३० एप्रिलपर्यंत - तालुकास्तरीय तांत्रिक समिती- नदीपात्र<br>दि. १ एप्रिलपर्यंत - महाराष्ट्र सागरी मंडळ-खाडीपात्र |
| ३ | तालुकास्तरीय समितीची बैठक | दि. १० मे पर्यंत परिपूर्ण प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीस शिफारशीसह सादर करणे |
| ४ | जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती बैठक | दि. २० मे पर्यंत वाळू लिलाव प्रक्रियेचा आराखडा तयार करणे. |
| ५ | पर्यावरण सल्लागार | दि. ३० मे पर्यंत वाळूगट प्रस्ताव पर्यावरण सल्लागार यांना पाठविणे |
| ६ | खाणकाम आराखडा व इतर तांत्रिक अहवाल, जिल्हा सर्वेक्षण अहवाल तयार करणे | दि.२० जूनपर्यंत पर्यावरण सल्लागार यांनी जिल्हाधिकारी यांना सादर करणे |

| | | |
|---|---|---|
| ७ | जिल्हा सर्वेक्षण अहवाल प्रसिध्द करणे व इतर बाबीं | दि. २५ जूनपर्यंत ३० दिवसांकरीता जिल्हा संकेतस्थळावर व वर्तमानपत्रामध्ये हरकतीकरिता प्रसिध्द करणे |
| ८ | जिल्हा सर्वेक्षण अहवाल अंतिम करणे | प्राप्त हरकतींवर निर्णय घेवून दि. ५ ऑगस्टपर्यंत जिल्हा खाणकाम आराखडा अंतिम करून जिल्हा संकेतस्थळावर प्रसिध्द करणे |
| ९ | SEAC व SEIAA कडे प्रस्ताव सादर करणे | पर्यावरण सल्लागार यांनी परिवेश पोर्टलवर वाळूगटाच्या पर्यावरण अनुमतीकरीता वाळूगटांचे प्रस्ताव दि.१० ऑगस्टपर्यंत ऑनलाईन सादर करणे |
| १० | पर्यावरण अनुमती | दि. १५ नोव्हेंबर पर्यंत वाळूगटांस पर्यावरण अनुमती प्राप्त करणे |
| ११ | ई- लिलाव प्रक्रिया करणे | दि. २० नोव्हेंबर ते ०५ डिसेंबरपर्यंत वाळू लिलाव प्रक्रिया करणे |
| १२ | यशस्वी लिलावधारकास इरादा पत्र (LOI) देणे, सुरक्षा ठेव व करारनामा, आदेश करणे | दि. २० डिसेंबरपर्यंत |
| १३ | लिलावधारकाच्या नावे पर्यावरण अनुमती हस्तांतर करण्याची कार्यवाही | जिल्हाधिकारी यांनी परिपूर्ण प्रस्ताव सादर केल्यानंतर १० दिवसाच्या आत पर्यावरण अनुमती लिलावधारकाच्या नावे हस्तांतर करण्याची कार्यवाही पर्यावरण विभागाने करावी. |
| **टिपः- १. वरील सर्वसाधारण वेळापत्रकापूर्वीदेखील कामकाज करता येईल.<br>२. स्थानिक भौगोलिक परिस्थितीनुसार वेळापत्रकात शिथिलता देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना असतील.** | | |

**(ई) वाळू/रेती लिलावाच्या कार्यपध्दतीबाबत सर्वसाधारण सूचना:-**

जिल्हा वाळू संनियंत्रण समितीने लिलावासाठी शिफारस केलेल्या वाळूगटांचे लिलाव ई-ऑक्शन पध्दतीने करण्यात यावेत.

(i) सर्व वाळूगट मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी दिलेले निदेश, तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचनेतील तरतूदीनुसार निश्चित करण्यात यावेत.

(ii) लिलावाचा कालावधी पावसाळ्याच्या कालावधीसह समाविष्ट असेल. दिनांक १० जून ते ३० सप्टेंबर हा पावसाळ्याचा कालावधी असेल व या कालावधीमध्ये वाळू उत्खनन करता येणार नाही, याची स्पष्ट जाणीव लिलावात भाग घेणाऱ्या सर्व संबंधितांना करुन देण्यात यावी.

(iii) उत्खननाचा कालावधी निश्चित करताना खालील बाबींचा विचार करण्यात यावा :-

क) वाळूच्या पुनर्भरणाचे वार्षिक मूल्यांकनाचा दर.

ख) भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा तसेच पाटबंधारे विभागाचा वाळू उपलब्धतेबाबतचा व्यवहार्यता (feasibility) अहवाल.

ग) पर्यावरण अनुमती व खाणकाम आराखड्यात नमूद स्थानिक व भौगोलिक परिस्थिती.

घ) Sustainable Sand Mining Guidelines,२०१६ व २०२० तसेच Sand Mining Framework,२०१८ मधील मार्गदर्शक तत्वे तसेच केंद्र व राज्य शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या मार्गदर्शक सूचना.

ङ) वाळू/रेतीगटाच्या लिलावाची जाहिरात जिल्ह्यातील दोन प्रमुख वर्तमानपत्रांत लिलावापूर्वी किमान १५ दिवस अगोदर प्रसिध्द करण्यात यावी. त्याच्या प्रती सर्व क्षेत्रीय महसूल अधिकाऱ्यांच्या कार्यालयात सूचना फलकावर लावण्यात याव्यात. तसेच जाहिरात शासनाच्या संकेतस्थळावरसुध्दा प्रसिध्द करण्यात यावी.

(iv) वाळू/रेती गट लिलावाच्या जाहिरातीमध्ये उत्खननाचा कालावधी, पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्याचा दिनांक, वाळू/रेतीगटाचा सर्वे क्रमांक, वाळू/रेतीगट क्रमांक, वाळू/रेतीगटाचे नाव, वाळू/रेतीगटातील अंदाजित वाळू/रेतीसाठा व वाळू/रेती गटाची हातची किंमत (Upset Price) या बाबी ठळकपणे नमूद करण्यात याव्यात.

(v) जाहिरातीमध्ये नमूद वाळू/ रेतीगटांत अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत, वाळूगटामधील वाळू मातीमिश्रीत आहे किंवा कसे, याची लिलावापूर्वी खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लिलावधारकाची राहील. वाळू/रेतीगटाचा ताबा घेऊन लिलावधारकाने वाळूचे उत्खनन केल्यानंतर यासंबंधीची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच वाळूगट बदलून देण्याची किंवा वाळू लिलावापोटी शासन जमा केलेल्या रकमेपैकी प्रमाणशीर रक्कम परत करण्याच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही, या बाबीसुध्दा जाहिरातीमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात याव्यात.

(vi) लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्या व लिलाव भरु इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्ती/संस्थेला लिलाव सादर करताना इसारा रक्कम RTGS/NEFT द्वारे अथवा जिल्हाधिकारी सूचित करतील त्यापद्धतीने भरावी लागेल.

(vii) प्रस्तावित लिलावासंदर्भात काही तक्रारी / आक्षेप / सूचना प्राप्त झाल्यास जिल्हाधिकारी व संयुक्त वाळूगटाच्या बाबतीत विभागीय आयुक्त यांनी त्याची तपासणी / चौकशी करावी व लिलाव न करण्यास सबळ कारणे असल्याची खात्री झाल्यास संबंधित वाळूगटाच्या लिलावाच्या प्रक्रियेबाबत योग्य तो निर्णय घेतील.

(viii) लिलावाचा कालावधी हा मंजूर दिनांकापासून पर्यावरण अनुमतीच्या कालावधीइतका असेल.

(ix) खाणकाम आराखड्यातील त्या त्या वर्षासाठी केलेल्या वार्षिक नियोजनानुसार संबंधित वाळूगटाच्या नकाशावर व प्रत्यक्षात क्षेत्रस्तरावर त्या त्या वर्षातून करावयाच्या उत्खननाबाबत हद्दी निश्चित करण्यात याव्यात व याप्रमाणे लिलावाच्या कालावधीत करावयाच्या उत्खननाचे नियोजन करण्यात यावे.

(x) खाणकाम आराखड्याप्रमाणे उत्खनन पूर्ण झालेल्या भागामध्ये पुन्हा कोणतेही उत्खनन होणार नाही याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. विभागीय आयुक्तांनी त्यांच्या विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये वाळू/रेतीगटांचे लिलाव शक्यतो एकाच दिवशी करण्यासाठी खाली नमूद केल्यानुसार नियोजन करावे.

(अ) जिल्ह्यातील वाळू / रेतीच्या निर्गतीसाठी निश्चित केलेल्या सर्व वाळू/रेतीगटांचा गटनिहाय लिलाव जिल्ह्याच्या मुख्यालयी एकाच दिवशी आयोजित करण्यात यावा.

(ब) लिलावाच्या दिवशी सर्व वाळूगटांच्या लिलावाची कार्यवाही पूर्ण न झाल्यास लगतच्या पुढील दिवशी सकाळी कार्यालयीन वेळेत कार्यवाही पुढे सुरु करावी.

(क) जिल्ह्यातील सर्व वाळूगटांचे लिलाव संबंधित जिल्हाधिकारी यांच्या व्यक्तीगत नियंत्रणाखाली व देखरेखीखाली पार पाडण्यात यावेत. जिल्हाधिकारी यांना हे काम कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही अन्य अधिकाऱ्याला नेमून देता येणार नाही.

(ड) संयुक्त वाळूगटाच्या बाबतीत संबंधित विभागीय आयुक्त यांच्या व्यक्तीगत नियंत्रणाखाली व देखरेखीखाली लिलावाची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. विभागीय आयुक्त यांना हे काम कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही अन्य अधिकाऱ्याला नेमून देता येणार नाही.

**(उ) लिलावाची प्रक्रिया**

(i) **नदीपात्रातील पर्यावरण अनुमतीप्राप्त वाळूगटांसाठी जिल्ह्यातील प्रत्येक उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व वाळूगटांचा एकत्रितरित्या एकच ई-लिलाव प्रसिद्ध करण्यात यावा. लिलावाचा कालावधी २ वर्षांसाठी राहील.**

(ii) **खाडीपात्रातील वाळूगटांसाठी महाराष्ट्र सागरी मंडळाने निश्चित केलेल्या प्रत्येक वाळू गटासाठी ई-लिलाव पद्धतीने कार्यवाही करण्यात यावी. सदर लिलावाचा कालावधी ३ वर्ष इतका राहील.**

(iii) ई-लिलावाची प्रक्रिया https://mahatenders.gov.in या प्रणालीद्वारे राबविण्यात यावी. याव्यतिरिक्त अन्य प्रणालीवरुन ई-लिलावाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

(iv) लिलाव प्रक्रिया पार पडल्यानंतर पुढील लिलाव प्रक्रियेची कार्यवाही ६ महिने शिल्लक असताना सुरु करण्यात यावी.

(v) ई-लिलाव पद्धतीद्वारे राबविण्यात येणाऱ्या सर्व लिलावामध्ये शासनाने प्रसिद्ध केलेल्या हातच्या किंमतीपेक्षा अधिक रकमेने लिलावाच्या बोलीची सुरुवात करण्यात येईल. ई-लिलावाची बोली ऑनलाईन पद्धतीने करताना कमीत कमी रु. ५०००/- किंवा त्यापटीमध्ये वाढ करणे बंधनकारक राहील.

(vi) यामध्ये सर्वोच्च बोली बोलणारा स्पर्धक यशस्वी बोलीधारक म्हणून समजला जाईल.

(vii) सदर यशस्वी बोलीधारकाकडून लिलाव रकमेच्या एकूण २५ टक्के रक्कम लिलावाच्या दिवसानंतर कार्यालयीन कामकाजाच्या ४८ तासांच्या आत (सुट्टीचे दिवस वगळून) जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात भरण्यात येईल.

(viii) लिलावाची उर्वरित ७५ टक्के रक्कम तदनंतर १५ दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात भरावी लागेल.

(ix) अतिअपवादात्मक परिस्थितीमध्येच लिलावाच्या बोलीच्या ३/४ तथा ७५ टक्के रक्कम भरण्याची मुदत १५ दिवस वाढविण्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांना राहतील. याबाबत विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या आदेशामध्ये अतिअपवादात्मक परिस्थितीबाबतची कारणे नमूद करणे बंधनकारक राहील.

(x) गौण खनिजाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी किंवा इतर कोणत्याही कारणास्तव विहित वेळेनंतर भरणा करुन घेऊ नयेत. लिलावाच्या रक्कमा विहित वेळेनंतर भरणा करुन घेतल्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुद्ध म. ना. से. (शिस्त व अपील) अधिनियम, १९७९ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

(xi) लिलावधारकाने १/४ रक्कम भरणा केली नाही तर त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात यावी. लिलावधारकाने १/४ रक्कम भरणा केल्यानंतर उर्वरित ३/४ रक्कम भरणा न केल्यास त्याने भरलेली १/४ रक्कम जप्त करावी. सदर जप्त केलेली रक्कम कोणत्याही परिस्थितीमध्ये लिलावधारकास परत करण्यात येणार नाही, तसेच, याबाबत मा. न्यायालयात दावा/रिट याचिका दाखल करणार नाही असे बंधपत्र लिलावधारकाकडून घेण्यात यावे या सर्व बाबींची याची लिलावधारकाने नोंद घ्यावी.

(xii) सर्वोच्च बोलीधारकाने (एच-१) लिलावाच्या उर्वरित रकमा जमा न केल्यास एच-१ च्या दराने एच-२ किंवा एच-३ संपूर्ण रक्कम भरण्यास तयार असल्यास लिलावाची संपूर्ण रक्कम भरुन घेऊन प्रथम एच-२ चा विचार करावा. एच-२ तयार नसल्यास एच-३ ला संधी देण्यात यावी. तथापि, एच-२ आणि एच-३ ने असमर्थता दर्शविल्यास जास्तीत जास्त २ वेळा फेरलिलाव करावा.

(xiii) ३ वेळा लिलाव प्रक्रिया राबवूनही वाळू गटाच्या लिलावास प्रतिसाद न मिळाल्या सदर वाळूगट स्थानिक वापरासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

(xiv) फेरलिलाव लिलाव केल्यास पूर्वीच्या लिलावाच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पूर्वीच्या लिलावधारकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात यावी. तथापि, फेरलिलावात पूर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक किंमत आल्यास त्यावर पूर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

(xv) लिलावासाठी निश्चित करण्यात आलेल्या वाळू/रेतीगटांकरीता हातच्या किंमतीपेक्षा (अपसेट प्राईसपेक्षा) कमी देकार प्राप्त झाल्यास किंवा देकार प्राप्त न झाल्यास त्याची सविस्तर कारणे नोंदवून त्या वाळू/रेतीगटांचा फेरलिलाव करण्यात यावा.

(xvi) लिलावाची संपूर्ण रक्कम भरणा केल्यानंतर दोन दिवसांत लिलावधारकास इरादापत्र (LOI) देण्यात येईल व सर्वोच्च बोलीधारकासोबत शासनाचा करारनामा करण्यात येईल. त्यानंतरच वाळूगटाचा ताबा देण्यात येईल.

(xvii) लिलावात भाग घेणाऱ्या ज्या व्यक्तीचा देकार / लिलाव स्वीकारण्यात आला नसेल, त्यांची लिलावात भाग घेण्यासाठी भरलेली इसारा रक्कम (EMD) लिलावाची कार्यवाही संपताच परत करण्यात यावी.

(xviii) ज्या लिलावधारकाच्या सर्वोच्च बोलीचा देकार/लिलाव स्वीकारण्यात येईल त्याला, सर्वेक्षण शुल्कापोटी रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) इतक्या किंवा आवश्यकतेप्रमाणे योग्य रकमेचा धनादेश उपसंचालक किंवा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्या नावाने जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करावा लागेल.

(xix) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकुलांसाठी सक्षम प्राधिकारी यांनी सादर केलेली यादी संबंधित तहसिलदार यांनी तपासून उपविभागीय अधिकारी यांना सादर करावी. उपविभागीय अधिकारी यांनी सदर यादी लिलावधारक यांना उपलब्ध करुन द्यावी.

(xx) सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या बांधकाम आराखड्यात नमूद केलेली अथवा जास्तीत जास्त ५ ब्रासपर्यंत वाळू लिलावधारक यांनी या First-Cum-First-Serve या तत्वावर लाभार्थ्याला विनामूल्य वाळू उपलब्ध करुन द्यावी. तसेच, ५ ब्रासपर्यंत वाळू घरकूल लाभार्थ्यांच्या गाडीमध्ये भरुन देण्याची कार्यवाही लिलावधारकाने करणे बंधनकारक राहील. ५ ब्रासपेक्षा जास्त वाळू कोणत्याही परिस्थितीमध्ये उपलब्ध करुन देण्यात येणार नाही याची संबंधितानी दक्षता घ्यावी. वाहतुकीचा खर्च घरकूल लाभार्थ्याने स्वत: करणे बंधनकारक राहील. सदर बाबींची नोंद महाखनिज प्रणालीमध्ये घेण्यात यावी.

(xxi) नदी/खाडीपात्रामधून वाळू निर्गतीकरीता पात्र लिलावधारक यांना त्यांनी उत्खनन केलेल्या वाळूच्या जास्तीत जास्त १० टक्के वाळू प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकुलांकरीता विनामूल्य उपलब्ध करुन देणे लिलावधारक यांना बंधनकारक राहील. त्याबाबत लिलावधारकास शासनामार्फत कोणतीही रक्कम अनुज्ञेय राहणार नाही याची लिलावधारकाने नोंद घ्यावी व सदर बाब जिल्हाधिकारी यांनी लिलावासाठी निर्गमित करण्यात येणाऱ्या ई-लिलावाच्या जाहिरातीमध्ये ठळकपणे नमूद करावी.

(xxii) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकुलांसाठी वाळू उपलब्ध करुन न दिल्यास नियमातील तरतुदीनुसार योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

(xxiii) लिलावातील / निविदेतील सर्वोच्च बोलीचा देकार स्वीकारावयाचा किंवा नाकारावयाचा निर्णय प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी यांनी घ्यावयाचा असून, सदर निर्णय संबंधितास लिलावाच्या दिवशीच कळविणे आवश्यक राहील. लिलाव नाकारावयाचा निर्णय घेतल्यास त्याची सविस्तर कारणे नोंदविण्यात यावी.

(xxiv) यशस्वी लिलावधारकासोबत वाळू/रेतीच्या लिलावाच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे योग्य त्या मुद्रांक शुल्काची रक्कम संबंधित लिलावधारकाने भरणे आवश्यक राहील अथवा याबाबतच्या प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे मुद्रांक शुल्क भरणे अनिवार्य राहील.

(xxv) लिलावधारकाने/परवानाधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तींच्या यथोचित पालनार्थ लिलावाच्या रक्कमेच्या २५% एवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी यांच्याकडे ठेवणे आवश्यक राहील. ही रक्कम लिलावधारकाने/परवानाधारकाने लिलावाच्या/परवान्याच्या मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास, लिलावाची/परवान्याची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल. अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

(xxvi) लिलावधारक/परवानाधारकाने जिल्हा परिषद / पंचायत समिती तसेच शासनाने विहित केलेले कर/शुल्क व जिल्हा खनिज प्रतिष्ठानकरीता शासन वेळोवेळी निश्चित करील एवढी अंशदानाची रक्कम भरणा करणे बंधनकारक राहील.

(xxvii) करारनामा केल्यानंतर लिलावधारकास वाळूस्थळाचा प्रत्यक्षात ताबा उशीरात उशीरा सात दिवसांत देण्यात यावा. वाळू/रेतीस्थळाचा ताबा लिलावधारकास सात दिवसांत सबळ कारणाशिवाय न दिल्यास त्यास जबाबदार असलेल्या अधिकारी /कर्मचारी यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी.

(xxviii) लिलावधारकास वाळूगटाचा ताबा देताना तसेच ताबा परत घेताना तहसिलदार किंवा जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्या समक्ष पंचनामा करण्यात यावा. वाळूगटात खड्डे असल्यास त्याचा उल्लेख पंचनाम्यामध्ये करावा. याबाबतचे ड्रोनद्वारे चित्रीकरणही करण्यात यावे.

(xxix) वाळू उत्खननासाठी ज्या लिलावधारकाची निवड करण्यात आली आहे त्यांना वाळू विक्रीसाठी व्यापारी परवाना देण्यात येऊ नये.

(xxx) लिलावधारकास लिलावात मंजूर केलेल्या एकूण वाळूसाठ्याची नोंद महाखनिज प्रणालीवर घेणे बंधनकारक राहील.

(xxxi) लिलावधारक यांनी वाळू विक्री करीता mahakhanij या ऑनलाईन प्रणालीचा अथवा शासन निर्देशित अशी प्रणाली वापरणे बंधनकारक राहील.

**(ऊ) वाळू/रेती उत्खननातील अडचणी व तक्रारीसंदर्भात जिल्हास्तरीय तक्रार निवारण समिती**

लिलाव झालेल्या वाळू/रेतीगटांतून वाळू उत्खननासाठी लिलावधारकास येणाऱ्या अडचणी व विविध व्यक्ती व संस्थांकडून वाळू उत्खननाबाबत करण्यात येणाऱ्या पर्यावरणविषयक तक्रारींदेखील जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समिती कामकाज पाहील.

(i) एकदा अत्युच्च बोली स्वीकारुन अंतिम करण्यात आलेल्या लिलावात वाळू उत्खनन करण्यास लिलावधारकास काही अडचणी / अडथळे आल्यास, त्यांनी याबाबत संबंधित तहसिलदार यांच्याकडे अर्ज सादर करावा. संबंधित तहसिलदार यांनी अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्या वाळूगटातून उत्खनन करण्यास येणाऱ्या अडचणींची चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल उक्त समितीसमोर सादर करावा. सदर अहवालावर उक्त समितीने १५ दिवसांत निर्णय घेणे आवश्यक राहील.

(ii) तसेच रेती / वाळूस्थळातून लिलावांच्या अटी/शर्तीचे उल्लंघन करुन वाळूचे उत्खनन होते, अवैध/नियमबाह्य वाळू उत्खननामुळे नदीकाठच्या गावातील पिण्याच्या व शेतीच्या पाण्यावर विपरीत परिणाम होतो, वाळूच्या वाहतूकीमुळे नदी काठच्या शेतीची/रस्त्यांची हानी होते, अशा स्वरुपाच्या तक्रारी विविध व्यक्ती व संस्थांकडून प्राप्त झाल्यास, अशा तक्रारीची तहसिलदार यांनी चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल उक्त समितीसमोर सादर करावा. सदर अहवालावर उक्त समितीने १५ दिवसांत निर्णय घेणे आवश्यक राहील.

(iii) लिलावधारकास वाळू उत्खनन करण्यास होणाऱ्या स्थानिक विरोधामुळे किंवा त्याच्या नियंत्रणाबाहेरील व नैसर्गिक सबळ कारणामुळे वाळूचे उत्खनन करता येत नसल्यास लिलावधारकाने त्वरीत जिल्हास्तरीय समितीसमोर अर्ज करावा. याप्रमाणे लेखी अर्ज प्राप्त झाल्यास, सदर समितीने अथवा त्यांच्या सदस्य प्रतिनिधीनी अशा वाळू / रेतीस्थळांना प्रत्यक्ष भेट देऊन, त्या वाळू/रेतीस्थळाचे पुनश्च: सर्वेक्षण करावे, तसेच तक्रारीतील अन्य मुद्यांबाबत स्थानिक चौकशी करावी व समितीच्या बैठकीत त्यावर विचारविनिमय करुन, संबंधित वाळू / रेतीगटातून वाळूचे उत्खनन चालू ठेवण्याविषयी किंवा ते बंद करण्याबाबत १५ दिवसांत उचित निर्णय घ्यावा व तो निर्णय संबंधित लिलावधारक, तक्रारदार व क्षेत्रिय महसूल अधिकाऱ्यांना कळवावा. जिल्हास्तरीय समितीने वाळूगटाच्या सर्वेक्षणाच्या वेळी व्हिडीओचित्रीकरण करण्याची दक्षता घ्यावी.

(iv) ज्या तक्रारदाराला त्याच्या तक्रारीच्या संदर्भात समितीने घेतलेला निर्णय मान्य नसेल, अशा तक्रारदाराला त्याबाबत संबंधित विभागीय आयुक्तांकडे अपील करता येईल. संबंधित विभागीय आयुक्त, जिल्हास्तरीय समितीने घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करुन कोणत्याही परिस्थितीत १५ दिवसांत उचित निर्णय घेतील. सदर निर्णय संबंधित तक्रारदार व संबंधित जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येईल.

(v) वरीलप्रमाणे वाळू उत्खननासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर समितीने चौकशी करुन, ज्या वाळूगटातील वाळूचे उत्खनन बंद करण्याविषयी निर्णय घेतला असेल, अशा वेळी लिलावधारकासोबत करण्यात आलेला करारनामा तात्काळ रद्द करण्यात यावा. तसेच संबंधित लिलावधारक यांना लिलावाची रक्कम अथवा यथास्थिती उत्खनन न करता आलेल्या वाळूची रक्कम परत करण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

(vi) लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत ठेका रद्द केल्यास किंवा लिलावधारकास वाळू/ रेती उत्खनन करण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही.

**(ए) लिलावाची रक्कम परत करण्यासंबंधी कार्यपध्दती :-**

**१) लिलावाची रक्कम परत करण्यासंबंधीची कारणे व अधिकार :-**

(i) वाळूगटाचा यशस्वीरित्या लिलाव झाल्यानंतर लिलावधारकाने लिलावाची रक्कम तसेच इतर संबंधित रकमा शासनजमा केल्यानंतर संबंधित लिलावधारक यांना काही अपरिहार्य कारणास्तव वाळूगटाचा ताबा देणे शक्य झाला नसेल/ होत नसेल अशा प्रकरणांत जिल्हास्तरीय समितीने अथवा त्यांच्या प्रतिनिधींनी स्थळ पहाणी करुन, वाळूगटाचा ताबा देणे शक्य नाही, असा अहवाल शिफारशीसह शासनास सादर केल्यास लिलावाची संपूर्ण रक्कम परत करण्याबाबत विचार करता येईल.

(ii) लिलावधारक यांनी लिलावाची रक्कम तसेच इतर संबंधित रकमा शासनजमा केल्या असतील आणि कोणत्याही न्यायालयीन आदेशाने किंवा शासनाच्या तसेच वरिष्ठ प्राधिकरणाच्या आदेशाने वाळू उत्खननास स्थगिती देण्यात आली असेल, अशा प्रकरणांत ज्या कालावधीसाठी स्थगिती देण्यात आली आहे, त्या कालावधीच्या प्रमाणात लिलावाची प्रमाणशीर रक्कम जिल्हास्तरिय सनियंत्रण समितीच्या शिफारशीनुसार परत करण्याबाबत शासनास विचार करता येईल.

(iii) अन्य कोणत्याही कारणास्तव वाळू उत्खनन करणे शक्य झाले नसेल/होत नसेल (उदा. ग्रामस्थांचा विरोध, प्रशासकीय यंत्रणांचा विरोध) अशा प्रकरणांत जिल्हास्तरीय समितीने अथवा त्यांच्या वतीने समितीमधील सदस्यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन, लिलावधारक तसेच ग्रामस्थांनी दिलेल्या कारणांची खातरजमा करुन, संबंधित वाळूगटातून वाळूचे उत्खनन करणे शक्य आहे किंवा कसे, याबाबत सुस्पष्ट शिफारशीसह अभिप्राय जिल्हाधिकारी यांना सादर करावेत. जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरीय समितीने वाळू उत्खनन न करता येण्याबाबत दिलेल्या कारणांची तपासणी करुन, तसेच संबंधित लिलावधारकास उपलब्ध कागदपत्रांची एक प्रत देण्यात येऊन त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात यावी. तद्पश्चात तर्कशुद्ध आदेश पारित करावेत. अशा प्रकरणी आवश्यकतेनुसार MRSAC, नागपूर यांचा अहवाल प्राप्त करुन घ्यावा.

**(२) लिलावाची प्रमाणशीर रक्कम परत करण्याकामी परिगणना :-**

(i) लिलावाची देकाराची रक्कम व लिलावातील अंदाजित वाळूसाठा यानुसार वाळूची प्रतिब्रास किंवा यथास्थिती प्रतिमेट्रीक टन किंमत परिगणित करण्यात यावी.

(ii) लिलावातील अंदाजित वाळूसाठा व वाळू उत्खननासाठी उपलब्ध कालावधी यानुसार दरदिवशी उत्खनन करावयाच्या वाळूचे सरासरी परिमाण निश्चित करण्यात यावे. लिलावधारकास ज्या कालावधीसाठी त्याच्या क्षमतेबाहेरील योग्य कारणामुळे वाळू उत्खनन स्थगित/बंद ठेवावे लागले तो कालावधी व दरदिवशी उत्खनन करावयाच्या वाळूचे सरासरी परिमाण यानुसार स्थगित/बंद कालावधीमध्ये उत्खनन करता येऊ न शकलेला वाळूसाठा निश्चित करण्यात यावा.

(iii) निश्चित केलेला वाळूसाठा व प्रत्यक्षात उत्खनन न करता आलेला वाळूसाठा यापैकी जो कमी असेल, तेवढ्या वाळूसाठी प्रतिब्रास किंवा यथास्थिती प्रतिमेट्रीक टन दरानुसार लिलावधारकास देय रकमेची परिगणना करण्यात यावी.

**(३) खालील कारणास्तव लिलावाची रक्कम परत करण्यात येणार नाही :-**

वाळू/रेती निर्गती धोरणातील अटी व शर्ती तसेच लिलावाच्या सूचनेतील अटी व शर्तींनुसार लिलावधारकाने लिलावात भाग घेण्यापूर्वी, वाळूस्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच, परवानगी दिलेल्या साधनांच्या सहाय्याने वाळूचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची आहे. त्यामुळे वाळूस्थळात अपेक्षित वाळूसाठा नाही, वाहतूकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध नाहीत, वाळूगटात पाणी आहे, मातीमिश्रीत वाळू आहे, वाळू उत्खननासाठी सक्शन पंपाची परवानगी मिळाली नाही अशा स्वरुपाच्या कोणत्याही कारणास्तव लिलावाच्या रकमेचा परतावा अनुज्ञेय असणार नाही.

लिलावधारकाने १/४ रक्कम विहीत वेळेत भरणा केली नाही तर त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात यावी. लिलावधारकाने १/४ रक्कम भरणा केल्यानंतर उर्वरित ३/४ रक्कम विहीत वेळेत भरणा न केल्यास त्याने भरलेली १/४ रक्कम जप्त करावी. सदर जप्त केलेली रक्कम कोणत्याही परिस्थितीमध्ये लिलावधारकास परत करण्यात येणार नाही, तसेच, याबाबत मा. न्यायालयात दावा/रिट याचिका दाखल करता येणार नाही.

**************************

## भाग —पाच

## <u>स्थानिक वापरासाठी व घरकुलांसाठी वाळू निर्गती करणे:-</u>

ग्रामपंचायत हद्दीमधील वाळूस्थळातून वाळू उत्खननाकरिता केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालय (भारत सरकार) यांचेकडील दि.२८ मार्च, २०२० च्या अधिसूचनेतील APPENDIX-IX “EXEMPTION OF CERTAIN CASES FROM REQUIREMENT OF ENVIRONMENTAL CLEARANCE” मधील मुद्दा क्रमांक ४ पुढीलप्रमाणे तरतूद आहे;

‘Customary extraction of sand and ordinary earth from sources situated in Gram Panchayat for personal use or community work in village.’

वरील तरतुदीनुसार ग्रामपंचायतीस त्यांच्या वैयक्तिक वापराकरीता किंवा सामुदायिक कार्याकरीता वाळू उपलब्ध करून देण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांच्याकडून करण्यात यावी.

## एक - वाळूस्थळ निश्चित करणे :-

(i) ग्रामपंचायत हद्दीमधील वाळूस्थळातून वाळू उत्खननाकरिता केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालय (भारत सरकार) यांचेकडील दि.२८ मार्च, २०२० च्या अधिसूचनेतील APPENDIX-IX मधील अनुक्रमांक ४ नुसार निश्चित वाळूगट तसेच, ज्या वाळूगटास पर्यावरण अनुमती प्राप्त झाली आहे व जे वाळूगट लिलावामध्ये गेलेले नाही असे नदी, नाले, ओढे इत्यादी मधील वाळूगट स्थानिक वापरासाठी व घरकुलांसाठी खालील समिती निश्चित करील:-

| | | |
|---|---|---|
| i | तहसिलदार | अध्यक्ष |
| ii | गट विकास अधिकारी | सदस्य |
| iii | मुख्याधिकारी नगरपरिषद/नगरपंचायत | सदस्य |
| iv | भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| v | नायब तहसिलदार | सदस्य सचिव |

(ii) वरील समितीने एकूण वाळूगटांच्या १० टक्के इतके वाळूगट घरकुलांसाठी राखीव ठेवणे सदर समितीस बंधनकारक राहील.

(iii) ग्रामपंचायत क्षेत्रातील वाळूचे एकूण परिमाण निश्चित करुन त्या परिमाणाची नोंद वरील समितीच्या मान्यतेने संबंधित तहसिलदार यांनी महाखनिज या संगणक प्रणालीवर घ्यावी.

(iv) पेसा क्षेत्रासाठी वाळूगट निश्चित करतांना पेसा कायद्यातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी. पेसा कायद्यामधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता सदर समितीने घ्यावी.

(v) संबंधित तहसिलदार यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण ग्रामपंचायतीची संख्या व ज्या गावांमध्ये वाळू उपलब्ध आहे अशा गावांची संख्या विचारात घेऊन त्या सर्व ग्रामपंचायतीची वाळूची मागणी व पुरवठा या बाबींचा विचार करुन समप्रमाणात वाळूचा पुरवठा कशा पद्धतीने करणे शक्य आहे याचा ताळमेळ घेऊन वाळूचे वितरण वरील समितीमार्फत करण्यात यावे.

## दोन- परवाना देण्याची कार्यपध्दती :-

i. अर्जदार यांनी वाळू मागणीसाठी अर्ज करताना आवश्यक असलेल्या वाळूचे परिमाण व ज्या ठिकाणी बांधकाम करण्यात येणार आहे त्या ठिकाणच्या गट/सर्व्हे नंबर/मालमत्ता पत्रक/CTS नंबर, नाव, पत्ता व बांधकाम आराखडा, इत्यादी कागदपत्रांसह महाखनिज या संगणक प्रणालीवर ऑनलाईन (Online) अर्ज करावा.

ii. ग्रामपंचायत हद्दीतील अर्जदाराने अर्जासोबत आधार कार्ड, वाळू/रेती मागणी प्रमाणीकरणाबाबत ग्रामसेवक यांचा दाखला, तसेच प्राप्त वाळूचा वापर स्वत:च्या वैयक्तिक वापरासाठीच करणार असल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र/बंधपत्र जोडणे आवश्यक राहील.

iii. ग्रामपंचायत क्षेत्रातील शासकीय बांधकामासाठी वाळूच्या मागणीबाबत बांधकाम आराखडा विचारात घेऊन ग्रामसेवक यांनी अर्ज करणे आवश्यक राहील.

iv. ग्रामपंचायत क्षेत्रासाठी निश्चित केलेले एकूण वाळूचे परिमाण व त्यासाठी करण्यात आलेली मागणी विचारात घेऊन तहसिलदार यांनी क्रमाधिष्ठित पध्दतीने (First Cum First serve) Online पासेस उपलब्ध करुन द्यावेत.

v. शासनाच्या गृहनिर्माण योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना (घरकूल लाभार्थी) स्वामित्वधन न आकारता कमाल ५ ब्रासपर्यंतच्या वाळूसाठी तहसिलदार यांनी ऑनलाईन पासेस **(Online)** उपलब्ध करुन द्यावेत.

vi. इतर व्यक्तींनी स्वामित्वधन रक्कम, जिल्हा खनिज प्रतिष्ठाण निधी व इतर अनुज्ञेय रकमेचा भरणा शासनाकडे केल्यानंतर संबंधित तहसिलदार यांनी बांधकाम क्षेत्राचा आराखडा विचारात घेऊन आवश्यक तेवढ्या परिमाणाच्या वाळूसाठी ऑनलाईन पासेस **(Online)** उपलब्ध करुन द्यावेत.

vii. स्थानिक वापरासाठी राखीव ठेवलेल्या वाळूगटामधून स्थानिक व्यक्तींना त्यांच्या स्वत:च्या विहिर बांधकामासाठी नियमानुसार स्वामित्वधन आकारुन आवश्यक तेवढी वाळू उपलब्ध करुन द्यावी.

viii. वाळू उत्खननाची व वाहतुकीची जबाबदारी अर्जदार/लाभार्थी यांची राहील. अर्जदार/लाभार्थी यांनी मागणी केलेल्या/ त्यांना मंजूर केलेल्या वाळूचे परिमाण विचारात घेऊन उत्खनन व वाहतुकीचा कालावधी तहसिलदार यांनी निश्चित करावा.

ix. समितीने निश्चित केलेल्या वाळूसाठ्यापेक्षा अधिक परवाने निर्गमित होणार नाहीत याची दक्षता तहसिलदार यांनी घ्यावी.

x. शासनाच्या गृहनिर्माण योजनेचे लाभार्थी/अर्जदार यांनी वाळू वाहतुकीसाठी वाहनांची व्यवस्था स्वत: करणे अनिवार्य राहील.

xi. स्थानिक पातळीवरील वाळू वाहतुकीकरीता ट्रॅक्टर अथवा ६ टायर्सच्या टिप्परचाच वापर करणे बंधनकारक असेल.

xii. ज्या गावकऱ्यांनी त्यांच्या स्वत:च्या वापरासाठी ऑनलाईन वाळूची नोंदणी केली आहे त्या गावकऱ्यांना मंजूर परिमाणाच्या वाळूची बैलगाडीमधून वाहतूक करण्यास परवानगी देण्यात यावी.

xiii. नदी/खाडीपात्रातून वाळू/रेतीचे उत्खनन सकाळी ०६.०० ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत करणे बंधनकारक असेल. सायंकाळी ०६.०० नंतर नदी/खाडीपात्रामधून वाळू उत्खनन व वाहतूक करणे प्रतिबंधित राहील.

xiv. वाहतुकीचा कालावधी संपल्यानंतर वाळू वाहतूक केल्याचे आढळून आल्यास तसेच वाहतूक पासवर खाडाखोड करून अवैध उत्खनन व वाहतूक केल्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६, भारतीय न्याय संहिता २०२३, पर्यावरण संवर्धन अधिनियम १९८६, खाण व खनिज नियमन १९५६, वन संवर्धन अधिनियम १९८० (लागू असल्यास) व प्रचलित कायद्यांमधील तरतुदीनुसार संबंधितांविरुद्ध दंडात्मक आणि/किंवा फौजदारी कारवाई करण्यात यावी.

xv. घरकूल लाभार्थी व इतर व्यक्ती यांनी त्यांना अनुज्ञेय वाळू त्रयस्थ व्यक्ती यांना दिल्याचे निदर्शनास आल्यास सदरची वाळू ही अनधिकृत समजून लाभार्थी व इतर व्यक्ती तसेच, संबंधित त्रयस्थ व्यक्ती यांचेवर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६, भारतीय न्याय संहिता २०२३ व प्रचलित कायद्यांमधील तरतुदीनुसार दंडात्मक तथा फौजदारी कारवाई करण्यात यावी.

********************

## भाग -सहा

## खाजगी शेतजमिनीमध्ये जमा झालेल्या वाळूचे निष्कासन करणे

i. शेतजमिनीमध्ये पूर परिस्थिती अथवा इतर नैसर्गिक कारणामुळे वाळू जमा झाल्याने शेतजमिनी नापीक होत असतात. सदर शेतजमिनी लागवडीयोग्य करण्यासाठी शेतजमिनीमध्ये जमा झालेल्या वाळू/रेतीचे निष्कासन करणे आवश्यक असते.

ii. शेतक-यांना शेतजमीन लागवडीयोग्य करण्यासाठी शेतजमिनीमध्ये नैसर्गिक कारणामुळे अथवा इतर कारणामुळे जमा झालेल्या वाळू/रेतीचे निष्कासन करणे आवश्यक असल्यास प्रस्तावित ठिकाणी किती प्रमाणात वाळू निष्कासन करणे उचित राहील, सदर उत्खननामुळे जलस्रोतावर होणाऱ्या संभाव्य परिमाणाबाबत उप विभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील खालील समिती त्याबाबतचा संयुक्त अहवाल अतिशय काटेकोरपणे तयार करुन जिल्हाधिकारी यांना सादर करील.

| | | |
|---|---|---|
| १ | उप विभागीय अधिकारी | अध्यक्ष |
| २ | भूमि अभिलेख यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | तालुका कृषी अधिकारी | सदस्य |
| ५ | जलसंपदा विभागाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | तहसिलदार | सदस्य सचिव |

iii. जिल्हाधिकारी हे सदर अहवालाची तपासणी करुन त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह निश्चित किती उत्खनन करणे आवश्यक आहे याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करतील.

**शेतामधील वाळू निर्गतीसाठी सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

(i) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील सर्व अटी व शर्तींचे पालन करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

(ii) जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणी शासन मान्यतेने कार्यवाही करावी.

(iii) निष्कासनासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्रातील मातीमिश्रीत वाळू/रेतीचे निष्कासन केल्यानंतर निष्कासित क्षेत्रामध्ये खड्डे रहाणार नाहीत याबाबत संबंधित क्षेत्रिय यंत्रणा यांनी पहाणी करणे आवश्यक आहे.

(iv) परवानाधारक, परवाना क्षेत्रातून निष्कासन केलेले गौण खनिज, काढून नेलेल्या गौण खनिजाचे प्रमाण, विक्री प्रमाणके, कामासाठी नेमलेल्या कामगारांची व त्यांना दिलेल्या पगाराची नोंदवही, या प्रयोजनासाठी आकारणी योग्य असलेले स्वामित्वधन व इतर आकार यांचे संपूर्ण अचूक लेखे ठेवील व सदर लेखे कोणत्याही महसूली अधिकारी/कर्मचारी यांना तपासण्यास उपलब्ध करुन देणे बंधनकारक असेल.

(v) अर्जदार यांना ज्या क्षेत्रामध्ये निष्कासन करण्यास परवानगी दिली आहे त्या हद्दीच्या बाहेर निष्कासन केले असल्यास व परवानगी दिलेल्या परिमाणापेक्षा अधिक प्रमाणात निष्कासन केले

असल्याचे आढळून आल्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार अर्जदार कारवाईस पात्र राहील.

(vi) अर्जदार यांनी शेतातील मातीमिश्रित रेती/वाळू निष्कासन केलेल्या परिमाण, वाहतूक, विक्री केलेला पक्षकार, गाडी नंबर, त्यामधील परिमाण, eTP इत्यादी विवरणपत्राचे प्रारुप जिल्हाधिकारी यांनी अर्जदार यांना महाखनिज प्रणालीद्वारे उपलब्ध करुन द्यावे व सदर विवरणपत्र जिल्हाधिकारी कार्यालयास प्रत्येक १० दिवसाला महाखनिज प्रणालीद्वारे ऑनलाईन सादर करण्याचे अर्जदारास बंधनकारक राहील.

(vii) अर्जदार यांनी GPS यंत्र लावलेल्या वाहनाद्वारेच वाहतूक करणे अनिवार्य राहील.

(viii) वाळूची उचल करण्यात येणा-या जागेचे Geo-fencing करणे बंधनकारक राहील.

(ix) ज्या शेतीक्षेत्रातून वाळू/रेती निष्कासन करण्याचे प्रस्तावित आहे त्या क्षेत्राच्या हद्दी दर्शविणाऱ्या दगडांसह सदर क्षेत्राचे प्रत्यक्ष करण्यात आलेल्या चित्रिकरणाची चित्रफित सविस्तर व स्पष्ट (Video clip) प्रस्तावासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

(x) निष्कासनासाठी निश्चित केलेल्या क्षेत्राच्या Geo- Cordinates सह संबंधित अर्जदार यांचा काढण्यात आलेल्या फोटोच्या प्रती प्रस्तावासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

(xi) वाळू/रेती निष्कासनाची वेळ सकाळी ६.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंतच राहील. त्यानंतर आढळल्यास अवैध समजण्यात येऊन विहित तरतूदीनुसार दंडात्मक कारवाई करण्यास पात्र राहील.

(xii) वाळूगटाच्या ठिकाणी २४X७ संपूर्ण छायाचित्रण होण्यासाठी आवश्यक तेवढे CCTV परवाना धारकामार्फत बसविण्यात यावेत.

(xiii) शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातील वाळू उत्खननासाठी भूमी अभिलेख विभागाने निश्चित केलेल्या हद्दीच्या बाहेर निष्कासन होत नसल्याबाबत संबंधित महसूल अधिकारी/कर्मचारी यांनी वेळोवेळी खात्री करावी व तसा अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करावा.

(xiv) ज्या ग्रामपंचायती पेसा क्षेत्राअंतर्गत येतात त्या गावातील शेतकऱ्यांच्या शेतातील वाळूचे निष्कासन करण्याचे प्रस्तावित असल्यास पेसा कायद्यातील तरतूदींचा भंग होणार नाही याची दक्षता सदर समितीने घ्यावी.

(xv) वाळू/रेती निष्कासनाबाबत मंजूरी देण्यात आलेल्या आदेशांची नोंद "महाखनिज" या पोर्टलवर नोंद घेण्याची कार्यवाही करण्यात यावी. तद्नंतर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अर्जदार यांना ऑनलाईन वाहतूक पासेस उपलब्ध करुन द्यावेत.

(xvi) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, जलसंपदा व भूमी अभिलेख यांच्या अहवालात नमूद अटी व शर्तींचे पालन करण्याची जबाबदारी सदर समितीची राहील.

(xvii) शेतजमिनीमध्ये जमा झालेल्या वाळूच्या उत्खननासाठी प्रती हेक्टरी रु. १,००,०००/- याप्रमाणे सुरक्षा ठेव रक्कम जिल्हाधिकारी यांच्याकडे जमा करणे बंधनकारक राहील.

(xviii) शेतजमीन लागवडयोग्य झाल्यावर शेतकऱ्याने किमान १ वर्ष सदर जमिनीवर शेती करणे बंधनकारक राहील. सदर क्षेत्रावर १ वर्ष शेती केली असल्याबाबतचा ऑनलाईन नोंदणी केलेला पीक पाहणी अहवाल तालुका कृषी अधिकारी यांनी सादर केल्यास जिल्हाधिकारी यांनी सुरक्षा ठेव रक्कम परत करावी. शेती लागवडयोग्य न झाल्यास किंवा शेती न केल्यास सुरक्षाठेव जप्त

करण्यात यावी व त्यानंतर त्या सर्व्हे नंबर/शेतातील वाळू उत्खननासाठी परवानगी/मुदतवाढ देण्यात येऊ नये.

(xix) ज्या शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतामधील वाळूचे निष्कासन केल्यानंतर शेतजमिनीमध्ये पिकांची लागवड केली नसेल व तद्नंतर पुन्हा-पुन्हा वाळू उत्खननासाठी अर्ज सादर केल्यास त्या शेतकऱ्याविरुद्ध या शासन निर्णयातील तरतूदीनुसार विविध कलमाखाली दंडात्मक/फौजदारी कारवाई जिल्हाधिकारी करु शकतील.

(xx) खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, केंद्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, आदेश तसेच, मा. सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय व राष्ट्रिय हरित लवाद यांनी वेळोवेळी पारीत केलेले आदेश तसेच, Sustainable Sand Mining Guidelines, २०१६, Sand Mining Framework, २०१८, Enforcement & Monitoring Guidelines for Sand Mining,२०२० मधील तरतुदी वाळू उत्खनन, वाहतूक व इतर प्रयोजनासाठी लागू राहतील.

**************************

## भाग - सात

## हातपाटी-डुबी पद्धतीने वाळू निर्गती करणे

(i) विनालिलाव परवाना पध्दतीने डुबी / हातपाटीव्दारे वाळू/रेती उत्खननासाठी राखीव गट " यामधून पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या स्थानिक व्यक्तींना तसेच अशा व्यक्तींच्या संस्थांना वाळू/रेती उत्खननाचे परवाने देण्यासाठी पर्यावरण अनुमती घेणे आवश्यक नाही. याबाबत संबधित जिल्हाधिकारी केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाचे कार्यालयीन आदेश दिनांक ०८.११.२०११ नुसार कार्यवाही करतील.

(ii) महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्रातील स्थानिक व्यक्तींना त्यांचा पारंपारिक व्यवसाय करणे शक्य व्हावे म्हणून सागरी किनारपट्टी / खाडी येथील Intertidal क्षेत्रातील डूबी / हातपाटी पध्दतीने वाळू/ रेतीचे उत्खनन करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ यांच्या वतीने जलालेखांक (Hydrographer) यांनी खाडीपात्रातील हातपाटी / डुबी पध्दतीने उत्खनन करण्यासाठी उपयुक्त रेतीसाठा असणाऱ्या Intertidal क्षेत्राचे सर्वेक्षण करुन व त्याप्रमाणे गटांची निश्चिती करावी व त्याबाबत परिपूर्ण प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करावा. सदर प्राप्त प्रस्तावानुसार जिल्हास्तरीय वाळू संनियंत्रण समिती ही, उपलब्ध गटांमधून स्थानिकांकडून उत्खननाची मागणी लक्षात घेऊन योग्य त्या गटांना “विनानिवदा परवाना पध्दतीने डुबी /हातपाटीद्वारे वाळू / रेती उत्खननासाठी राखीव गट" असे चिन्हांकित करुन अंतिम निर्णय घेतील.

(iii) हातपाटी व डूबीसाठी राखीव ठेवण्यात येणाऱ्या वाळू/रेतीगटासाठी हातची किंमत ठरविण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक वाळूगटामधील निर्गतीसाठी उपलब्ध असलेला वाळूसाठा व स्वामित्वधनाची रक्कम विचारात घ्यावी.

(iv) वाळूची उचल करण्यात येणा-या जागेचे Geo-fencing करणे बंधनकारक राहील.

(v) प्रत्येक हातपाटी/डुबी वाळूगटाचे २४X७ संपूर्ण छायाचित्रण होण्यासाठी आवश्यक तेवढे CCTV परवाना धारकामार्फत बसविण्यात यावेत.

(vi) डुबी / हातपाटी पध्दतीने वाळू/रेतीचे उत्खनन करण्यासाठी राखीव केलेल्या गटातील वाळू विक्रीसाठी संबंधित व्यक्ती/संस्थांना स्वामित्वधन आकारुन ऑनलाईन वाहतूक परवाना संबंधित जिल्हाधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावा.

(vii) हातपाटी/डुबी या पारंपारिक पद्धतीने उत्खनन केल्या जाणा-या वाळूगटामधून सक्शन पंपाने/ इतर यांत्रिक साधनाने वाळू उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची मान्यता तात्काळ रद्द करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा. तसेच अशा व्यक्ती/ संस्थाना भविष्यात पुन्हा परवानगी देण्यात येऊ नये.

*********************

## भाग- आठ

## कृत्रिम वाळू

नैसर्गिक वाळूचे पर्यावरणीय महत्त्व, नैसर्गिक वाळूचा तुडवडा या बाबी विचारात घेऊन कॉक्रीटच्या बांधकामामध्ये कृत्रिम वाळूच्या वापरास प्रोत्साहन देण्यात यावे. त्यासाठी जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व शासनाच्या इतर विभागांच्या बांधकामांमध्ये लागणाऱ्या एकूण वाळूच्या किमान २० टक्के कृत्रिम वाळू वापरणे बंधनकारक करण्यात यावे.

सुरुवातीला हे प्रमाण २० टक्के करण्यात येऊन हे पुढ़ील तीन वर्षापर्यंत १०० टक्के कृत्रिम वाळू बंधनकारक करण्यात यावी.

तसेच जिल्ह्यातील खाजगी बांधकामांमध्येदेखील कृत्रिम वाळूचा वापर केला जाईल यासाठी जिल्हास्तरीय समितीने प्रयत्न करावेत.

कृत्रिम वाळूच्या उत्पादनासाठी प्रोत्साहन देण्याच्या हेतुने स्वतंत्र कृत्रिम वाळू धोरण तयार करण्यात येत आहे.

*************************

## भाग - नऊ

## केंद्र/ राज्य शासनाच्या मोठ्या खाणीमधील ओव्हरबर्डनमधील वाळू व इतर गौण खनिजांची निर्गती

नैसर्गिक वाळूचे पर्यावरणीय महत्त्व खूप असून नैसर्गिक वाळू जलपरिसंस्थेसाठी महत्वाची आहे. त्यामुळे नदीपात्रातील वाळूवर पडणारा ताण कमी करण्यासाठी कोळसा किंवा लोह खनिजासारख्या इतर मुख्य खनिजांच्या खाणकामधून उप-उत्पादने म्हणून निघणाऱ्या ओव्हरबर्डनमधून तसेच केंद्र/ राज्य शासनाच्या अंगीकृत खाणीमधून निघणाऱ्या ओव्हरबर्डनमधून तयार करता येणाऱ्या पर्यावरणपूरक वाळूच्या वापरास प्रोत्साहन देण्याच्या अनुषंगाने खालील तरतुदी करण्यात येत आहेत:-

(i) केंद्र / राज्य शासनाच्या मोठ्या खाणींना पर्यावरण अनुमती घेताना सादर केलेल्या खनिकर्म आराखडयामध्ये Disposal of Overburden by wash sand नमूद असेल तर Overburden मधून वाळू / रेती निष्कासन करताना नव्याने पर्यावरण अनुमती घेण्याची आवश्यकता नाही. तथापि, संबंधित उद्योगांनी पर्यावरण अनुमती घेताना सादर केलेल्या खनिकर्म आराखड्यामध्ये Disposal of Overburden by wash sand नमूद नसेल तर Overburden मधून वाळू / रेती निष्कासन करताना नव्याने पर्यावरण अनुमती घेणे आवश्यक आहे.

(ii) मोठ्या खाणींमधील ओव्हरबर्डनमधून निघणाऱ्या वाळू/रेती (Wash Sand) साठी WCL व MOIL या कंपन्यांनी रुपये १०५०/- प्रती ब्रास शुल्क आकारण्याचे मान्य केले असून त्याप्रमाणे प्रतीब्रास शुल्क आकारण्याची कार्यवाही करावी.

(iii) ओव्हरबर्डनमधील वाळूसाठी (Wash Sand) स्वामित्वधनाची रक्कम रुपये २००/- प्रती ब्रास एवढे आकारण्याचा शासनाने निर्णय घेतला असून याबाबतची अधिसूचना विधी व न्याय विभागाच्या सहमतीने स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

(iv) ओव्हर्बडनमधून Wash Sand व्यतिरिक्त निघणा-या इतर गौण खनिजांसाठी WCL व MOIL या कंपन्यांनी रक्कम रुपये ५०/- प्रती ब्रास शुल्क आकारण्याचे मान्य केले आहे.

(v) ओव्हरबर्डनमधील इतर गौण खनिजांसाठी स्वामित्वधनाची रक्कम रु.२५/- प्रती ब्रास एवढे आकारण्याचा निर्णय शासनाने घेतला असून याबाबतची अधिसूचना विधी व न्याय विभागाच्या सहमतीने स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

(vi) सदर कंपन्यांच्या ओव्हरबर्डनमधून निघणारी Wash Sand त्या कंपन्यांसाठी आवश्यक असल्यास सदर Wash Sand ची महाखनिज या प्रणालीवर ऑनलाईन नोंदणी करुन शासन निर्धारित करेल त्या स्वामित्वधनाचा भरणा करुन महाखनिज या प्रणालीवरुन ऑनलाईन पासेस मंजूर करण्याची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी यांचेमार्फत करण्यात यावी.

(vii) सदर कंपन्यांच्या ओव्हरबर्डनमधून निघणारी Wash Sand भूमिगत खाणी Stowing करण्यासाठी अपुरी पडल्यास सदर कंपन्यांनी त्यांना हव्या असलेल्या वाळूची मागणी महाखनिज या ऑनलाईन प्रणालीद्वारे नोंद करुन त्यांना आवश्यक असलेली वाळू शासनाच्या प्रचलित स्वामित्वधनाची रक्कम रु.६००/- व इतर शुल्क आकारुन कशा प्रकारे उपलब्ध करुन द्यावी याबाबतचा निर्णय जिल्हाधिकारी यांनी घ्यावा.

(viii) स्वामित्वधनाची रक्कम जिल्हाधिकारी यांनी महाखनिज या Online प्रणालीवर सदर कंपन्यांची नोंद करुन पासेस संबंधित खाणीच्या क्षेत्रिय अधिकारी यांच्या नावे द्यावेत.

(ix) खाणधारक कंपन्यांनी वाळूची/इतर गौण खनिजांची विक्री महाखनिज या प्रणालीवरुन ऑनलाईन करणे बंधनकारक राहील. त्यासाठी महाखनिज या प्रणालीमध्ये योग्य तो बदल करण्यात यावा.

(x) खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम, केंद्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, आदेश तसेच, मा. सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय व राष्ट्रिय हरित लवाद यांनी वेळोवेळी पारीत केलेले आदेश तसेच, Sustainable Sand Mining Guidelines, २०१६, Sand Mining Framework, २०१८, Enforcement & Monitoring Guidelines for Sand Mining,२०२० मधील तरतूदी ओव्हरबर्डनमधून निघणा-या वाळू (Wash Sand) व इतर गौण खनिजाच्या उत्खनन, वाहतूक व इतर प्रयोजनासाठी लागू राहतील.

(xi) खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम तसेच याअंतर्गत असलेले नियम अथवा गौण खनिजाच्या अनुषंगाने, केंद्र शासनाकडून निर्गमित निर्देश अथवा याअनुषंगाने हरीत लवाद अथवा सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन होणार नाही, याबाबत संबंधित यंत्रणेने दक्षता घ्यावी

(xii) वाहतुकीकरिता वापरण्यात येणाऱ्या सर्व वाहनांची/यंत्राची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयास देणे बंधनकारक राहील व त्या वाहनांची नोंद महाखनिज प्रणालीवर घेण्यात यावी.

(xiii) परवानगी दिलेल्या जागेव्यतिरिक्त इतर जागेवरून ओव्हरबर्डनची उचल करू नये व त्या जागेचे Geo-fencing करणे बंधनकारक राहील.

(xiv) सदर कंपन्यांमार्फत गौण खनिजाचा साठा व विक्री करण्यात येणा-या जागेवर सीसीटीव्ही कॅमेरे लावून त्याचा मासिक अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करणे बंधनकारक राहील.

(xv) सदर कंपन्यांनी अवैध गौण खनिजाची वाहतूक केल्याचे निष्पन्न झाल्यास नियमानुसार दंडनीय कार्यवाही करून देण्यात आलेली परवानगी रद्द करण्याची कार्यवाही करावी.

(xvi) वरील तरतुदी व्यतिरिक्त इतर अटी व शर्ती लागू करण्याची मुभा जिल्हाधिकारी यांना राहील.

*************************

## भाग -दहा

## परराज्यातून येणाऱ्या वाळूचे सनियंत्रण

परराज्यामधून राज्यामध्ये येणाऱ्या वाळूचे संनियंत्रण करणे तसेच, परराज्यामधील वाळू व राज्यामधील वाळू यामधील भेद ओळखून अवैध वाळू वाहतूकीस आळा घालण्याबाबत पुढीलप्रमणे कार्यपद्धती निश्चित करण्यात येत आहे:-

(i) परराज्यातून वाळू/रेती वाहतूक करण्यासाठी संबंधित व्यक्ती/संस्था यांना गौण खनिजाच्या उत्खनन व वाहतूक याबाबत महाखनिज या ऑनलाईन प्रणालीमध्ये नोंदणी करणे बंधनकारक राहील.

(ii) ज्या व्यक्तींना/संस्थांना वाळूघाट / वाळू डेपो संबंधित राज्याच्या प्रशासनाने मान्यता प्रदान केली असेल केवळ त्यांनाच परवाना द्यावा.

(iii) इतर राज्यातून वाळूची वाहतूक करणा-या वाहनांची राज्याच्या सिमेवर तपासणी नाके (Check Post) उभारुन तपासाणी करण्यात यावी.

(iv) परराज्यातून वैध मार्गाने येणा-या वाळूची क्षेत्रीय कार्यालयाने अनुज्ञप्ती तपासून त्या राज्यातून आणलेली वाळू वैध परवान्याद्वारे आणल्याची खात्री करावी.

(v) महाखनिज प्रणालीवर अर्जदाराला वाळू वाहतुकीकरीता प्रमाणित मुख्य स्रोताबाबत पुरावा म्हणून आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

(vi) संबंधितांना झिरो रॉयल्टी पास देण्याबाबतची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने करावी.

(vii) संबंधित व्यक्ती/संस्था स्वतःच्या वापरासाठी परराज्यातून आणलेल्या वाळूचा साठा न करता थेट बांधकामाच्या ठिकाणी नेणार असल्यास अशा व्यक्ती/संस्थेकडे त्या राज्यातील वैध वाहतूक पास परिमाणासह असणे बंधनकारक राहील.

(viii) राज्यात प्रवेश करणा-या वाहनासोबत प्रवेश केलेल्या जिल्हयातील e-TP सोबतच अंतिम ठिकाणापर्यंत वाळू वाहतूक होईपर्यंत ज्या-ज्या जिल्ह्यातून सदर वाहन मार्गक्रमन करील त्या-त्या जिल्ह्यांची e-TP अनिवार्य राहील.

(ix) महाखनिज प्रणालीमध्ये परराज्यातून येणा-या वाहनाचा तपशील, वाहनाचा प्रकार व त्याची क्षमता इत्यादी माहिती नोंदविणे बंधनकारक राहील.

(x) परवानाधारक / अर्जदार यांनी वाळू वाहतुकीसाठी निश्चित केलेल्या मार्गाची माहिती महाखनिज प्रणालीवर नोंदवून त्याच मार्गाने मार्गक्रमण करणे बंधनकारक राहील.

(xi) संबंधित व्यक्ती/संस्था परराज्यातून आणलेल्या वाळूचा साठा करुन विक्री करणार असेल तर, महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील नियम ७१ ते ७८ मधील तरतूदीनूसार व्यापारी परवाना घेणे आवश्यक आहे. तसेच आवश्यकतेनुसार व्यापारी परवान्याचे नुतनीकरण करता येईल.

(xii) संबंधित व्यक्ती/संस्था हे ज्या जमिनीवर परराज्यातून आणलेल्या वाळूचा साठा करणार असतील ती जमीन अकृषक असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने क्षेत्रीय कार्यालयाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

(xiii) संबंधित व्यक्ती/संस्था यांनी वाळूचा साठा व विक्रीची दैनंदिन नोंद महाखनिज प्रणालीवर ऑनलाईन घेणे बंधनकारक राहील.

(xiv) परराज्यातून आणलेल्या वाळूचा वाळूसाठा वैध परवान्यापेक्षा जास्त आढळल्यास अथवा झिरो रॉयल्टी पासेसशिवाय वाहतूक केल्याचे आढळून आल्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या ४८ (७) व ४८(८) नुसार दंडात्मक कारवाई करावी.

***************************

## भाग -आकरा

## जप्त वाळू / रेतीसाठ्याच्या विल्हेवाटीबाबत अनुसरावयाची कार्यपद्धती

(i) जप्त केलेला वाळूसाठा चोरी होऊ नये, पावसाच्या पाण्याने वाळू वाहून जाऊ नये, धूप होऊन वाळूसाठा कमी होऊ नये, या दृष्टीकोनातून जप्त केलेल्या वाळूगटाचा लिलाव एक महिन्याच्या आत करणे बंधनकारक राहील.

(ii) उप विभागातील लिलाव झालेल्या वाळूगटांच्या लिलावातील सरासरी प्रतीब्रास रक्कम हातची किंमत ग्राह्य धरुन सदर किंमतीनुसार जप्त केलेल्या वाळूसाठ्याचा लिलाव उपविभागीय अधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांच्या पूर्वमान्यतेने करावा. ज्या उप विभागामध्ये लिलाव झालेला नाही तथापि, जप्त केलेला वाळू साठा आढळून आल्यास अशा जप्त वाळूसाठी स्वामित्वधनाची रक्कम हीच हातची किंमत म्हणून ग्राह्य धरण्यात यावी.

(iii) जिल्हाधिकारी यांनी एक महिन्याच्या आत जप्त केलेल्या वाळूचा लिलाव न केल्यास त्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त यांना सादर करुन त्यावर विभागीय आयुक्त यांनी ७ दिवसामध्ये निर्णय घ्यावा.

(iv) जप्त वाळू / रेतीसाठ्याच्या लिलावाबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यावरही जे वाळूसाठे लिलावात जाणार नाहीत, असे वाळूसाठे जिल्ह्यातील संबंधित शासकीय कामांच्या अंदाजपत्रकात नमूद केलेली वाळूची किंमत किंवा शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या वाळूच्या स्वामित्वधनाची रक्कम यापैकी जी रक्कम जास्त असेल त्या किंमतीनुसार अशा शासकीय कामांसाठी उपलब्ध करुन देण्याकामी परवाने मंजूर करण्याची मुभा जिल्हाधिकाऱ्यांना राहील.

**********************

## भाग- बारा

## जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी व मासिक अहवाल

### एक :- जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीमधून करण्यात येणा-या प्रशासकीय खर्चाबाबत

केंद्र शासनाने खाण व खनिजे (विकास व विनियमन) सुधारणा अधिनियम, २०१५ मधील कलम ९ (ब) मध्ये राज्य शासनाने अधिसूचनेद्वारे खनिकर्मामुळे बाधित प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडीएफ-०६१५/५१/प्र.क्र.३४/उद्योग-९, दिनांक ०१.०९.२०१६ अन्वये, खनिकर्म जिल्ह्यातील पर्यावरण दर्जा वाढ करण्याच्या अनुषंगाने अन्य उपाययोजनांकरीता अनुज्ञेय असलेल्या निधीमधून पर्यावरणविषयक बाबींसाठी होणारा खर्च भागविण्यात यावा.

जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन करुन, सर्व प्रकारच्या गौण खनिज खाणपट्टाधारक, परवानाधारक तसेच वाळू लिलावधारकांकडून शासनास जमा करण्यात येणाऱ्या स्वामित्वधनाच्या रकमेच्या १० टक्के रक्कम जिल्हा खनिज प्रतिष्ठानसाठी अंशदान म्हणून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर निधीमधून ग्रामपंचायती क्षेत्रातील रस्ते, आरोग्य, इत्यादीसाठी निधी आवश्यकतेनुसार उपलब्ध करता येईल.

शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडीएफ-०६१५/५१/ प्र.क्र.३४/ उद्योग-९, दिनांक ०१.०९.२०१६ अन्वये, जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीमध्ये जमा होणाऱ्या रकमेच्या पाच टक्क्यांपेक्षा जास्त नाही अशी रक्कम प्रशासकीय किंवा आस्थापना खर्च भागविण्यासाठी खर्च करता येते. सदर मर्यादेच्या अधिन राहून उक्त निधीतून खालील बाबींकरीता गरजेनुसार खर्च करता येऊ शकेल:-

(i) अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी करावयाच्या आवश्यक उपाययोजना करणे.
(ii) जप्त केलेले वाहन बंद स्थितीत असल्यास सदर वाहन सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी उपाययोजना करणे.
(iii) जप्त केलेल्या वाळूसाठ्याचे संरक्षण करण्यासाठी व क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या संरक्षणासाठी सुरक्षा रक्षक नियुक्त करणे.
(iv) शासकीय अधिकाऱ्यांवर वारंवार होणारे हल्ले विचारात घेता त्यांना संरक्षण मिळणे आवश्यक असल्याने त्यासाठी आवश्यक तेवढे सुरक्षा रक्षक व प्रत्येक जिल्ह्याच्या खनिकर्म विभागात त्यांना अनुज्ञेय असलेले डिझेल/पेट्रोल वाहन व त्यावरील खर्च तसेच, या कामासाठी वापरलेल्या महसूल अधिकाऱ्याच्या वाहनासाठी लागणारे इंधन (या कामासाठी वापर झालेल्या प्रमाणातच) जिल्हा खनिज प्रतिष्ठाण निधीमधून उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करावी.
(v) दक्षता व निरीक्षण पथकासाठी खाजगी वाहने भाड्याने घेणे.
(vi) वाळू उपलब्धतेचा अंदाज काढणे, वाळू उत्खननाचे पर्यवेक्षण व संनियंत्रण याकरिता नावीन्यपूर्ण प्रकल्प/ तंत्रज्ञान विकसित करणे.

## दोन - सनियंत्रण व उत्खननाबाबत मासिक अहवाल सादर करणे

### अ) सनियंत्रण

(i) वाळू वाहतूकीसाठी केंद्र शासन/राज्य शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या निदेशांनुसार संनियंत्रण प्रकियेचा वापर करणे अनिवार्य राहील. तसेच वाळूच्या अवैध उत्खनन/वाहतूकीस प्रभाविपणे आळा घालण्याच्या दृष्टीने उक्त संनियंत्रण प्रकियेबरोबरच शासनास कोणताही आर्थिक भार पडणार नाही, अशा प्रणालीचा वापर करण्याची संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना मुभा राहील. तसेच वाळू /गौण खनिजाच्या उत्खनन कार्यपध्दतीत होणारी महसूलाची गळती व उत्खनन प्रक्रिया यावर MRSAC या तंत्रज्ञानाचा वापर जिल्हाधिकारी यांनी करावा.
(ii) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य व्हावे, यासाठी तहसिल, उप विभाग, जिल्हास्तरावर व विभागीय स्तरावर पोलीस, परिवहन विभागातील अधिकारी/कर्मचारी व महसूल अधिकारी / कर्मचारी यांची स्वतंत्र भरारी / दक्षता पथके जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांनी निर्माण करावी. सदर पथकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अवैध उत्खनन व वाहतुकीस अटकाव करणे ही या पथकाची सामुहिक जबाबदारी राहील.
(iii) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन /वाहतूकीची घटना वा प्रकरण ज्या महसूल अधिकारी / कर्मचारी यांच्या कार्यक्षेत्रात उघडकीस येईल, ते अधिकारी / कर्मचारी सदर प्रकरणात

जबाबदार आहेत काय, याची कसून तपासणी करण्यात यावी. तपासणीमध्ये संबंधित स्थानिक अधिकारी / कर्मचारी अवैध उत्खननाकडे हेतुत: दुर्लक्ष करीत असल्याचे आढळून आले किंवा त्यांनी अवैध उत्खनन / वाहतुकीवर पुरेसे नियंत्रण न ठेवल्याचे आढळल्यास त्या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन, त्यांच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी.

**ब) उत्खननाबद्दल मासिक अहवाल:-**

प्रत्येक जिल्ह्यातील उपविभागामध्ये एकूण वाळूघाट किती आहेत, त्यापैकी किती वाळूघाटांचा लिलाव झाला, किती वाळूघाटांचा लिलाव झाला नाही, या लिलावात शासनास किती महसूल प्राप्त झाला, प्रत्येक वाळूघाटातून दर महिन्याला किती ब्रास वाळू उत्खनन करण्यात आली, तसेच जिल्ह्यामध्ये अवैध उत्खननाची किती प्रकरणे प्रत्येक महिन्याला उघडकीस आली व किती प्रकरणात संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले, किती दंड आकारण्यात आला याबाबतचे मासिक विवरणपत्र जिल्हाधिकारी यांनी शासनास व संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय व पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (Environment Impact Assessment Authority) यांना सादर करावे.

**********************

## भाग - तेरा

## वाळू / रेती उत्खननासाठी सर्वसाधारण निर्बंध व अटी/शर्ती व प्रतिबंधात्मक उपाययोजना

### ( अ) वाळू / रेती उत्खननासाठी सर्वसाधारण निर्बंध व अटी/शर्ती

१) लिलावधारकाने/परवानाधारकाने त्याला मंजूर केलेल्या वाळूगटाच्या ठिकाणी फलक, दिशादर्शक लावून, उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करुन सीमा दर्शविणारे खांब उभारणे अनिवार्य राहील. विहीत केलेल्या क्षेत्राच्या बाहेर वाळू/रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच लिलावधारकाने जिल्हाधिकारी यांच्या पूर्वपरवानगीने सदर वाळूगटाचे कामकाज पाहण्यासाठी नियुक्त केलेले उपठेकेदार, व्यवस्थापक व कर्मचारी यांची नावे, पत्ता व जागेचा तपशील दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक राहील.

२) माननीय सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (सी) क्र.१९६२८-१९६२९/२००९ मध्ये दि.२७/०२/२०१२ रोजी दिलेले आदेश तसेच नदीपात्रातील पाणी स्वच्छ व शुध्द राहण्यासाठी व नैसर्गिकरित्या पाण्याचे नदीपात्रात वहन होण्यासाठी वाळू/रेती गटातून जास्तीत जास्त ३ मीटर किंवा पाण्याची पातळी यापैकी जे कमी असेल तितक्या खोलीपर्यंत किंवा पर्यावरण अनुमतीमध्ये परवानगी दिलेल्या खोलीपर्यंत यापैकी जे कमी असेल तेवढ्या खोलीपर्यंतच लिलावधारक/ परवानाधारकाला वाळू/रेतीचे उत्खनन करता येईल.

३) नदीपात्रातील वाळूथराची जाडी सातत्याने राहण्यासाठी बेंच मार्क निश्चित करुन बेंच मार्कच्या खाली कोणत्याही परिस्थितीत वाळूचे उत्खनन करता येणार नाही. निश्चित केलेले बेंच मार्क पडणार नाहीत, तसेच नदीपात्रातील वाळूच्या थराच्या आधारे आजूबाजूच्या विहिरीतील पाण्याची पातळी कमी होणार नाही, याबाबत योग्य ती दक्षता लिलावधारकाने घेणे आवश्यक राहील.

४) लिलावधारकास/परवानाधारकास मंजूर केलेल्या वाळूसाठ्याइतकेच उत्खनन करण्याचा अधिकार प्राप्त होईल.

५) राज्यात अवैध उत्खनन व वाहतूक ही प्रामुख्याने रात्रीच्या वेळी होत असल्याचे निदर्शनास येत असल्याने त्यावर प्रतिबंध करण्यासाठी नदी/खाडीपात्रातून वाळू/रेतीचे उत्खनन सकाळी

०६.०० ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत करणे बंधनकारक असेल. सायंकाळी ०६.०० नंतर नदी/खाडीपात्रातून उत्खनन व वाहतूक करणे प्रतिबंधित राहील. या कालावधीव्यतिरिक्त इतर वेळेत केलेले उत्खनन अवैध समजून कारवाई करण्यात येईल.

६) महाखनिज ऑनलाईन प्रणालीवरुन वाळू विक्रीबाबत देण्यात येणारा (eTP) परवाना सायंकाळी ६.०० वाजेनंतर Generate होणार नाही, असा बदल महाखनिज सॉफ्टवेअर मध्ये करण्यात यावा.

७) महाखनिज प्रणालीद्वारे वाळू विक्रीबाबत देण्यात येणाऱ्या परवान्यानुसार (eTP) मंजूर कालावधीपर्यंत वाळूची वाहतूक करता येईल.

८) उत्खननासाठी मंजूर करण्यात आलेल्या वाळू गटाचे Geo- fencing करणे बंधनकारक राहील व सदर Geo- fencing च्या चतु:सिमांचे Geo- Cordinates जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या आदेशामध्ये नमूद करणे बंधनकारक राहील.

९) सदर मंजूर वाळूगटामधून वाळूचे उत्खनन करुन वाहतूक करताना ज्या वाहनातून वाळूची वाहतूक होणार आहे त्याचा वाहतूक पास (ETP) हा सदर वाळूगटाच्या चतु:सिमांचे Geo-fencing च्या क्षेत्राच्या आत तयार करण्यात येऊन त्याबाबत महाखनिज संगणक प्रणालीवर नोंद घेणे बंधनकारक राहील.

१०) वाळूगटाधून उत्खनन केलेल्या वाळूची नोंद महाखनिज प्रणालीवर ऑनलाईन घेणे बंधनकारक असेल.

११) तसेच ग्राहकांना सकाळी ०६.०० ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत वाळू विक्री करणे बंधनकारक राहील. विक्री केलेल्या वाळूची नोंद महाखनिज प्रणालीवर घेण्यात येईल.

१२) कोणत्याही रेल्वे पुलाच्या व रस्ते पुलाच्या कोणत्याही बाजूने ६०० मीटर्स (२००० फूट) अंतराच्या आत वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

१३) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे असलेल्या ठिकाणापासून १०० मीटर व त्या आतील वाळूगट पाटबंधारे विभाग / विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी प्रस्तावित करु नयेत.

१४) सार्वजनिक पाणवठा / पाणीपुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून १०० मीटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढ्या अंतरापलीकडे उत्खनन करणे आवश्यक राहील.

१५) रस्ते/पायवाट म्हणून वापरण्यात येणाऱ्या जमिनीतून वाळू/ रेती काढता येणार नाही.

१६) वाळू उत्खननासाठी लिलाव किंवा परवाना देण्यामागे वाणिज्यिक किंवा महसूल मिळविणे हा एकमेव उद्देश नसून, विकास कामासाठी आवश्यक वाळू उपलब्ध व्हावी हा प्रमुख उद्देश आहे. तसेच नदीपात्रात वाळू साठल्याने आजूबाजूच्या परिसरात पूरसदृश्य परिस्थिती उद्भवू नये म्हणून वाळूचे उत्खनन केले जाते. लिलावधारकास लिलाव मंजूर केल्यानंतर व पर्यावरण अनुमती लिलावधारकाच्या नावे हस्तांतरित झाल्यानंतर वाळू घाताचा ताबा देण्यात यावा. लिलावधारकाने / परवानाधारकाने वाळूगटाचा ताबा दिल्याच्या दिनांकापासून एका आठवड्याच्या आत वाळू/रेतीचे उत्खनन सुरू करणे आवश्यक राहील.

१७) अवैध उत्खनन अधिक प्रभावीपणे रोखण्याच्या दृष्टीने शासनास कोणताही आर्थिक भार पडणार नाही, अशा अतिरिक्त उपाययोजनांच्या संदर्भात संबंधित जिल्हाधिकारी लिलावधारकांबरोबर करावयाच्या करारनाम्यात तत्संबंधी अटी व शर्तींचा समावेश करु शकतील.

१८) लिलावधारकाला/परवानाधारकाला नदीपात्रातून /नाल्यातून रेती /वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून रेती/वाळू उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारक/परवानाधारक यांनी घ्यावयाची आहे.

१९) लिलावधारक/परवानाधारक यांनी गावकऱ्यांच्या निस्तारहक्कांस बाधा पोहोचविता कामा नये.

२०) लिलावधारकाने/परवानाधारकाने रेती / वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेतीबाबतची दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरीक्षक, महसूल अधिकारी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरीक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांना उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

२१) लिलावधारकास/परवानाधारकास वाळूची / रेतीची वाहतूक करण्यासाठी परवाना द्यावयाचा असल्यास त्याने सहकारी संस्था/संस्थांना प्राधान्य दिले पाहिजे.

२२) वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू ताडपत्रीने आच्छादित करुनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतूक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

२३) रेती / वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनास त्याच्या वहनक्षमतेइतक्याच परिमाणाची वाहतूक करावी. वहनक्षमतेपेक्षा अधिक परिमाणाची रेती / वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण वाळू अवैध आहे, असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीबाबत मोटर वाहन कायद्यानुसार कारवाई करावी. दंडनीय कारवाईबरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात यावा.

२४) रेती / वाळूचे उत्खनन करताना अथवा वाहतूक करताना अपघात झाल्यास लिलावधारकाने/परवानाधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

२५) लिलावधारकाने/परवानाधारकाने नियमात नमूद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतुदीनुसार असलेले नियम (संबंधित विभागास लागू असलेले नियम) आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदीनुसार लागू असलेल्या नियमांचे तसेच पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेतीचा/वाळूचा पूर्ण उपयोग गौण खनिज म्हणूनच केला पाहिजे.

२६) रेतीचे/वाळूचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास लिलावधारकाने/ परवानाधारकाने विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांच्याकडे सात दिवसात कळविले पाहिजे.

२७) अंदाजित परिमाणापेक्षा अधिक वाळूसाठा रेतीगटात असल्यास त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिमाणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास लिलावधारकास परवानगी देता येणार नाही, या अटी करारनाम्यात अंतर्भूत कराव्यात.

२८) मंजूर क्षेत्रातून करारात नमूद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्यानेच वाळूचे/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळूस्थळात पाणी आहे, वाळूगटामधील वाळू मातीमिश्रीत आहे अशा तसेच मानवी वा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळूगट बदलून दिला जाणार नाही.तसेच या कारणास्तव कोणताही परतावा देण्यात येणार नाही.

२९) उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळू / रेतीची साठवणूक, लिलाव ज्या जिल्हाधिकाऱ्याने केला असेल त्याच जिल्ह्यात करावी लागेल व त्यासाठी अकृषक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी लिलावधारकाची असेल. वाळू / रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळू / रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळूचा / रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर १० दिवसांत उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल. अशा वाळूच्या / रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत

लिलावधारकास अथवा त्यांच्या ठेकेदारास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही.

३०) लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच १० दिवसांची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू / रेतीसाठा करण्यास परवानगी देता येणार नाही किंवा त्याच्या वाहतूकीसाठी दुय्यम वाहतूक पासेस देण्यात येणार नाहीत. याबाबत लिलावधारकाशी करावयाच्या करारपत्रात अशा प्रकारची अट अंतर्भूत करण्यात यावी.

३१) शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय लिलावधारकास लिलाव / ठेका दुसऱ्या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुसऱ्या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा लिलावानंतर भागीदारही घेता येणार नाही.

३२) लिलावधारक/परवानाधारक त्यांना मंजूर केलेल्या वाळूगटातून उत्खनन केले आहे, त्याबाबतचे विवरणपत्र सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित करुन दर महिन्याच्या १० तारखेला महाखनिज या प्रणालीवर ऑनलाईन सादर करणे बंधनकारक राहील. जे लिलावधारक/परवानाधारक मासिक विवरणपत्र विहित वेळेत ऑनलाईन सादर करणार नाहीत, त्यांच्याविरुध्द ठेका रद्द करण्याबाबत तसेच त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

३३) मंजूर क्षेत्रातील ज्या ठिकाणातून रेती / वाळू काढण्याने धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतींना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी जिल्हाधिकारी यांचा उत्खनन करण्यास प्रतिबंध करण्याचा निर्णय अंतिम राहील.

३४) एकदा अत्युच्च बोली स्विकारुन अंतिम करण्यात आलेल्या लिलावात कोणत्याही परिस्थितीत रेती / वाळू उत्खननाचा कालावधी वाढवून देण्याचा अथवा कोणत्याही कारणास्तव रेतीचा / वाळूचा गट बदलून देण्याची मागणी लिलावधारकास करता येणार नाही. उत्खनन केलेल्या वाळूच्या / रेतीच्या वाहतुकीसाठी पर्यावरण अनुमती देताना दर्शविण्यात आलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतूकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतुकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतुकीसाठी बंद आहेत या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत रेती / वाळू उत्खननाचा कालावधी वाढवून दिला जाणार नाही अथवा रेती/वाळूगट बदलून दिला जाणार नाही.

३५) अवैध वाळू / रेतीसाठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ मधील नियम ४८ (७) व (८) नुसार कारवाई करण्यात यावी.

३६) लिलावधारकाने/ परवानाधारकाने वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची माहिती जिल्हाधिकारी यांना देण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत वाहनाच्या वहनक्षमतेपेक्षा जास्त वाहतूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

३७) वाळूचे / रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहील. अशा हानीची / नुकसानीची परिगणना सक्षम अधिकाऱ्याकडून करण्यात येईल व त्याबाबतचा यांचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकीबाकीच्या वसुलीप्रमाणे संबंधित लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

३८) ट्रॅक्टरद्वारे अवैध गौण खनिज वाहतूक प्रकरणी दंडाची रक्कम पूर्वीप्रमाणे रु.१ लक्ष कायम ठेवण्यात येत आहे.

**दोन - प्रतिबंधात्मक उपाययोजना** :-

वाळूचे अवैध उत्खनन व वाहतुक होणार नाही, यासाठी संबंधित जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त यांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

(i) प्रत्येक वाळूगटांमधील वाळू वाहतूकीसाठी एकच रस्ता ठेवण्यात यावा.

(ii) प्रत्येक वाळूगटाच्या ठिकाणी २४X७ छायाचित्रण होण्यासाठी लिलावधारकामार्फत CCTV बसविण्यात यावेत. यापैकी किमान एक CCTV कॅमेरा वाहतुकीच्या साधनात ज्या ठिकाणी वाळू भरण्यात येते त्या ठिकाणी बसविण्यात यावा व वाळूगटातील वाळूची वाहतूक करणारी सर्व वाहने गावातील ज्या ठिकाणावरुन ये-जा करतात त्या ठिकाणच्या छायाचित्रणासाठी वापरण्यात यावा. वाळूगटाच्या ठिकाणी बसविलेल्या CCTV ची किंमत लिलावधारकांना/परवानाधारकांना सोसणे आवश्यक राहील. तसेच लिलाव न झालेल्या वाळूगटातील वाळूची अवैध वाहतुक होवू नये यासाठी ज्या ठिकाणाहून वाहतूक होण्याची शक्यता आहे, अशा ठिकाणीही सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे व यासाठी जिल्हा नियोजन समितीकडून निधी उपलब्ध करुन घेण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

(iii) लिलावधारकांने/परवानाधारकाने CCTV सार्वजनिक सर्वेक्षणासाठी शासनाने निश्चित केलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

(iv) लिलावधारकाने/परवानाधारकाने बसविलेल्या CCTV चा Address जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त व शासनाच्या महसूल व वन विभागाकडे देणे आवश्यक राहील. लिलावधारकाने वाळू उत्खनन व वाहतूकीचे छायाचित्रण असलेली सीडी दर १५ दिवसांनी तहसिलदार कार्यालयात जमा करणे अनिवार्य राहील. लिलावधारकाने / परवानाधारकाने वाळूघाटात बसविलेले सीसीटीव्हीच्या आधारे वाळू उत्खननावर संनियंत्रण करण्याकरिता तहसील कार्यालयामध्ये 24 X 7 कार्यरत सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात यावी. सदर नियंत्रण कक्षाची संबंधित जिल्हाधिकारी /उप विभागीय अधिकारी यांनी वेळोवेळी पाहणी करावी. तसेच, लिलावधारकाने / परवानाधारकाने वाळूघाटात बसविलेले सीसीटीव्हीच्या आधारे वाळू उत्खननावर संनियंत्रण करण्याकरिता सर्वसामान्य नागरिकांसाठी Access उपलब्ध करुन देण्यात येईल.

(v) तहसिलदारांनी सदर सीडीमधील छायाचित्रण आपल्या अधिनस्त यंत्रणेमार्फत तपासून घ्यावे. संबंधित तहसिलदार व उप विभागीय अधिकारी यांनी अधूनमधून स्वत: देखील अशा छायाचित्रणाची तपासणी करावी. अशा तपासणीत सी.सी.टी.व्ही. कॅमेरा काही काळासाठी बंद असल्याचे निदर्शनास आल्यास, सनियंत्रण कक्षामधील वाळू घाटाचे CCTV फुटेज पाहून अनधिकृत उत्खनन आढळल्यास मंजूर वाळूसाठा व वाळू उत्खननासाठी उपलब्ध दिवस यानुसार दरदिवशी करावयाचे उत्खनन विचारात घेऊन, जेवढे दिवस सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बंद होता, तेवढे दिवस सरासरी उत्खनन केले, असे गृहीत धरुन लिलावाच्या रकमेनुसार प्रतीब्रास रक्कम परिगणित करुन त्या दराने सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बंद असलेल्या कालावधीत उत्खनन केलेल्या वाळूच्या रक्कमेएवढी दंडात्मक रक्कम लिलावधारकाकडून वसूल करण्यात यावी. एखाद्या दिवशी कितीही कालावधीसाठी सी.सी.टी.व्ही बंद असला, तरीही पूर्ण दिवसासाठी सी.सी.टी.व्ही. बंद असल्याचे समजून वरीलप्रमाणे दंडात्मक रकमेची आकारणी व वसूली करण्यात यावी.

(vi) प्रत्येक गाव कामगार तलाठ्याने त्याच्या कार्यक्षेत्रातील वाळूगटास नियमितपणे भेट देणे आवश्यक राहील. त्यासाठी संबंधित लिलावधारकाकडे/परवानाधारकाकडे तहसिलदारांनी प्रमाणित करून दिलेली भेटवही ठेवणे बंधनकारक असेल. तलाठ्याने वाळूगटास भेट दिल्यानंतर दैनंदिन भेट-वहीमध्ये त्याची नोंद करुन दिनांकित स्वाक्षरी करावी.

(vii) संबंधित मंडळ अधिकाऱ्यानेही नियमितपणे त्यांच्या कार्यक्षेत्रातील वाळूगटाची पाहणी करून, त्याची नोंद उक्त दैनंदिन भेटवहीमध्ये करुन, दिनांकित स्वाक्षरी करावी.

(viii) संबंधित तहसिलदार, उपविभागीय अधिकारी यांनी त्यांच्या क्षेत्रातील वाळूगटाला वेळोवेळी आकस्मिक भेट देऊन त्याची दैनंदिन भेटवहीत नोंद करुन, दिनांकित स्वाक्षरी करावी. अधिकाऱ्यांनी रेतीगटाची तपासणी करताना खालील बाबी कटाक्षाने पहाव्यात :-

अ) उत्खननास प्रारंभ केल्यापासून तपासणीच्या दिनांकापर्यंत उत्खनन केलेल्या वाळूचे परिमाण व तपासणीच्या दिवसापर्यंत उत्खननाच्या ठिकाणी असलेला वाळूसाठा.

आ)संबंधित तलाठी व ग्रामसेवक तसेच संबंधित लिलावधारक यांच्यासमक्ष दरमहा वाळूगटामधील उत्खननाची मोजणी करण्यात यावी.

इ) नदीपात्रात पूल असल्यास त्या पुलाच्या आजूबाजूस तसेच बेंच मार्कच्या आजूबाजूस व बेंच मार्कच्या खाली वाळू उत्खनन केले जात आहे किंवा कसे याची पहाणी करण्यात यावी व त्याची नोंद भेटवहीत घेण्यात यावी.

ई) नदीच्या काठाजवळच्या लगतच्या भागामध्ये उत्खनन केले जाते आहे किंवा कसे व त्याकरीता पोकलेन/ जेसीबी यांसारख्या यांत्रिक साधनांचा वापर करण्यात आला आहे किंवा कसे, याची पहाणी करण्यात यावी व त्याची नोंद भेटवहीत घेण्यात यावी.

उ) उत्खनन केलेला वाळूसाठा विहित अंतरापर्यंत करण्यात आलेला आहे किंवा कसे, याची नोंद भेटवहीत घेण्यात यावी.

(ix) जिल्हाधिकाऱ्यांनी तपासणी बाबतची वरील मानके काटेकोरपणे पाळली जात आहेत किंवा कसे, याची खात्री करुन घ्यावी. तपासणीनंतरही एखाद्या अधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात अवैध वाळू उत्खनन/ वाहतूक अव्याहतपणे होत असल्याचे निष्पन्न झाल्यास, संबंधित अधिकाऱ्याचे अवैध उत्खनन/वाहतूक करणाऱ्या व्यक्तींशी संगनमत आहे असे गृहीत धरुन संबंधितांविरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांमार्फत शासनास सादर करण्यात यावा.

**तीन-लिलावधारक/परवानाधारकाने अटी/शर्तींचे उल्लंघन केल्यास करावयाची कारवाई:-**

(i) लिलावधारकांनी आपापसात संगनमत केल्यास, ठराविक वाळूघाटांचा लिलाव पुन्हा पुन्हा लावूनसुध्दा कोणीही लिलावधारक बोली बोलण्यास पुढे येत नाहीत व त्यामुळे वाळूघाटाचा लिलाव होऊ शकत नाही. अशा प्रकारे संगनमत करुन शासनाच्या महसूलाचे नुकसान करणाऱ्या तसेच अवैध उत्खनन व वाहतुकीसारखे गुन्हे करणाऱ्या लिलावधारकास संपूर्ण राज्यासाठी काळ्या यादीत (Black List) टाकण्यात येईल.

(ii) पर्यावरण अनुमतीमध्ये परवानगी दिलेल्या खोलीपेक्षा जास्त खोल उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास लिलावधारक/परवानाधारकाकडून घेण्यात आलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन, लिलाव/परवाना रद्द करण्यात यावा. तसेच असे उत्खनन अवैध ठरवून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ मधील कलम ४८ (७) व (८) मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात यावी.

(iii) वाळू/रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनचालकाकडे वैध बारकोडयुक्त वाहतूक पास आहे किंवा नाही, याची शहानिशा करण्यात यावी. याबाबतच्या निरीक्षणाच्या वेळी संबंधित वाहनचालकाकडे वैध बारकोडयुक्त वाहतूक पास आढळला नाही किंवा वाहतूक पासचा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ मधील कलम ४८ (७) व (८) नुसार कारवाई करण्यात यावी.

(iv) अवैध उत्खनन व वाहतुकीच्या प्रकरणामध्ये संबंधित ठेकेदार / लिलावधारक दोषी आढळल्यास त्यांच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात यावी.

यापूर्वी भारतीय दंड संहितेमधील कलम, ३४,११४,३७९,३९२,३९३,३९४,३९६ इत्यादी कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत होती. आता भारतीय दंड संहितेऐवजी भारतीय न्याय संहितेचा अवलंब करण्यात आला असून त्यामधील कलम ३(५), ५४, ३०३(२), ३०९(४), ३०९(५), ३०९(६) व ३१०(३) या कलमातील तरतूदीची खात्री करुन कारवाई करावी तसेच, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ मधील कलम ४८ (७) मधील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करणे व  कलम ४८(८) मधील तरतुदीनुसार वाळू उत्खननासाठी वापरलेली यंत्रसामग्री व वाहतुकीसाठी वापरलेली वाहने जप्त करणे, अवैध उत्खनन केलेली वाळू जप्त करणे इत्यादी कारवाई करण्यात यावी.

(v) वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या प्रकरणात वाळूच्या बाजारभावाच्या आधारे दंडाची आकारणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील वाळूच्या बाजारभावाची सरासरी काढून दरवर्षी दिनांक १ जानेवारी रोजी वाळूचे बाजारभाव निश्चित करावे व त्यानुसार दंडाच्या रकमेची परिगणना करावी. प्रकरणपरत्वे दंडात्मक कारवाई करण्यापूर्वी संबंधितांना नोटीस देवून त्यांची बाजू ऐकून घेऊन कायद्यातील तरतुदीनुसार स्वयंस्पष्ट आदेश पारित करण्यात यावेत.

(vi) तसेच वाळूचे अवैध उत्खनन/ वाहतूकीच्या अनुषंगाने कारवाई करतांना महसूल अधिकारी / कर्मचारी यांच्यावर हल्ले होत असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा अशा ठिकाणी संघटित गुन्हेगारीचे प्रकार आढळून आल्यास अशा संघटित गुन्हेगारीविरुध्द "महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्ये विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ या अधिनियमान्वये कारवाई करण्यात यावी.

(vii) लिलावधारक / परवानाधारक यांनी पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीचे तसेच पर्यावरणविषयक नियमातील तरतूदींचे पालन करणे बंधनकारक असेल. सदर तरतुदीचे उल्लंघन झाल्यास ते पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ मधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

****************

## भाग -चौदा

i) वाळू/रेती निर्गतीबाबत अथवा त्याअनुषंगाने यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय, शासन ज्ञापन, शासन परिपत्रक अथवा शासन पत्रान्वये देण्यात आलेले आदेश, सूचना जर या शासन निर्णयातील काही तरतूदींशी विसंगत असतील तर अशा प्रकरणी या शासन निर्णयातील तरतुदी अंतिम समजून त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

ii) यापूर्वी दिनांक १९/०४/२०२३ व १६/०२/२०२४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार जे वाळू डेपो कार्यान्वित झालेले आहेत, ते वाळू डेपो त्यांच्या मंजूर कालावधीपर्यंत तसेच सुरु राहतील. तथापि,  सदर वाळू डेपोकरीता दिनांक १६/०२/२०२४ च्या धोरणातील प्रकरण क्रमांक सहा (III) मधील वाळू/रेती विक्रीची किंमत आकारण्यात यावी.

iii) सदर धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना देण्याचे अधिकार शासनास/विभागास राहतील.

iv) सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

v) सदर शासन निर्णय पर्यावरण विभाग, उद्योग (खनिकर्म) विभाग व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक १७४/२०२५/व्यय-९, दि.१९.०३.२०२५ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०४०८१७४६०२८३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(शिवाजी चौरे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अ.मु.स., मंत्रालय, मुंबई
३) मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई
७) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
८) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई
९) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
१०) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
११) सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) सर्व मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य, विधानभवन, मुंबई.
१३) महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), मुंबई.
१४) महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), नागपूर.
१५) सर्व मंत्रालयीन विभाग.
१६) सर्व विभागीय आयुक्त.
१७) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
१८) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१९) प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर.
२०) सर्व जिल्हाधिकारी.
२१) निवडनस्ती "ख कार्यासन.